पाक्षिक प्रदेश बीजेपी

# मनोगत

मुंबई • वर्ष: 7 • अंक: 2 • 16 जानेवारी, 2025 • पृष्ठसंख्या: 36 • किंमत: 5 रू.







# महाविजय कार्यकर्त्यांना समर्पित




## अध्यक्षीय मनोगत

# ऐतिहासिक अधिवेशनातील नवा निर्धार

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनात आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात भारतीय जनता पार्टी महायुतीने विधानसभा निवडणूक २०२४ मध्ये महाजनादेश मिळविल्यानंतर प्रथमच शिर्डी येथे पक्षाचे प्रदेश ते मंडल पातळीवरील सर्व नेते कार्यकर्ते एकत्र जमले होते. या ऐतिहासिक महाअधिवेशनात जनतेचे आभार मानतानाच मा. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या नेतृत्वात भाजपाच्या सर्व कार्यकर्त्यांनी पक्षाला पंचायत ते पार्लमेंट अशा सर्व पातळ्यांवर विजयी करण्याचा निर्धार नव्याने केला. महाअधिवेशनातील कार्यकर्त्यांचा उत्साह पाहण्यासारखा होता. राज्याच्या सर्व भागातून प्रतिनिधी आले होते. साईबाबांची शिर्डी भाजपाच्या कार्यकर्त्यांनी फुलून गेली होती. साईबाबांचा श्रद्धा आणि सबुरीचा संदेश हा भाजपाच्या कार्यकर्त्यांसाठी गुरुमंत्र असतो. निष्ठेने आणि सबुरीने काम करणाऱ्याला पक्षात यश मिळतेच. शिर्डीच्या महाअधिवेशनात विधानसभा निवडणुकीतील ऐतिहासिक विजयाचा आनंद, मा. देवेंद्रजी पुन्हा मुख्यमंत्री झाल्याचे समाधान आणि संघटनपर्वात पक्षाला बळकट करून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जिंकण्याचा निर्धार असे सर्व काही होते. विधानसभा निवडणुकीतील भाजपा महायुतीच्या यशाची अनेक कारणे आहेत. त्यांची चर्चा महाअधिवेशनात झालीच. मा. मोदीजींचे नेतृत्व, मा. अमितभाईंची रणनिती, मा. देवेंद्रजींचा वज्र निर्धार यामुळे हा विजय मिळाला. लाडकी बहीण, शेतकऱ्यांना मोफत वीज अशा योजनांमुळे हा विजय मिळाला. पण या सर्व कारणांइतकेच महत्त्वाचे कारण आहे, ते म्हणजे भाजपाचे संघटन. पक्षाच्या कार्यकर्त्यांनी दिवस रात्र मेहनत करून हा विजय खेचून आणला. त्यामुळे मा. देवेंद्रजींनी हा महाविजय कार्यकर्त्यांना समर्पित असल्याचे सांगितले. इतका मोठा विजय मिळाल्यानंतर आता पुन्हा एकदा पक्ष संघटना बळकट करायची आहे. सध्या पक्षाचे संघटनपर्व चालू आहे. सदस्य नोंदणी सुरू आहे. राज्याच्या प्रत्येक बूथमध्ये पक्ष सदस्यांची नोंदणी करून भाजपाला पुन्हा एकदा सर्वव्यापी व सर्वस्पर्शी बनवायचे आहे. 'बूथ जीता तो चुनाव जीता', ही यशाची गुरुकिल्ली आहे. यामध्ये बूथ पातळीवर काम करणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्याचे महत्त्व आहे. आता काही महिन्यात राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होतील. महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायती, जिल्हा परिषद व पंचायत समिती यामध्ये पक्षाच्या हजारो कार्यकर्त्यांना निवडणुका लढवून नेतृत्व करण्याची संधी मिळणार आहे. मा. अमितभाई यांनी दिलेल्या संदेशानुसार या सर्व निवडणुकांमध्ये भाजपाला विजयी करायचे आहे. यापूर्वी २०१६-१७ मध्ये मोठ्या संख्येने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका झाल्या होत्या. त्यामध्ये महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांमध्ये भाजपाच नंबर वन होता. आता पुन्हा तसे पण त्यापेक्षा मोठे यश मिळवायचे आहे. त्यासाठी बूथ पातळीवर लक्ष केंद्रित करणे महत्त्वाचे आहे. विधानसभा निवडणुकीतील ऐतिहासिक विजयामुळे भाजपाने नवी झेप घेतली आहे. पक्ष संघटना आणि कार्यकर्त्यांच्या भरवशावर निवडणूक जिंकता येते, हे आपण पुन्हा सिद्ध केले आहे. आपल्याला आता त्याच मार्गाने जायचे आहे. विजयाचा नवा निर्धार साकारायचा आहे.

**चंद्रशेखर बावनकुळे**

# अंतरंग




संपादक : गणेश हाके
सल्लागार : माधव भांडारी
आ. अतुल भातखळकर

@manogatbjp

सर्व भाजपा हितचिंतक, कार्यकर्ते आणि वाचकांना विनंती आहे की आपण आपल्या प्रतिक्रिया,
bjpmaha.manogat@gmail.com
editor.bjpmanogat@gmail.com
येथे पाठवाव्यात.

संपादकीय सल्लागार

चंद्रहास मिरासदार
सजावट व मांडणी : गौतम आर्य
सहाय्यक : प्रेरणा तळेकर-वीर

विभागीय समन्वयक

मराठवाडा (छत्रपती संभाजीनगर) : श्रीनिवास कुलकर्णी
विदर्भ: दीपक माई, त्रिकाल अडसड, प्रवीण गमे
पश्चिम महाराष्ट्र: संजय मयेकर
उत्तर महाराष्ट्र: गोविंद बोरसे

महाराष्ट्रातील महाविजय देशाच्या राजकारणात... ०४



महाविजय कार्यकर्त्यांना समर्पित ०८



दीड कोटी सदस्य नोंदणीचे लक्ष्य गाठायचे आहे १०



नवा महाराष्ट्र घडवू... ११



शांतता, विकासाचे नवे पर्व १३



आणिबाणीत घटना दुरुस्ती करुन काँग्रेसने लोकशाहीचा गळा घोटला १५



हे पाक्षिक भारतीय जनता पार्टीसाठी प्रकाशक, मुद्रक, मुकुंद कुलकर्णी यांनी विवेक मुद्रणालय, ५, कामत इंडस्ट्रीयल इस्टेट, ३९६, वीर सावरकर मार्ग, प्रभादेवी, मुंबई - ४००० २० येथे छापून भारतीय जनता पार्टी, प्रदेश कार्यालय, जीवन बीमा मार्ग, वसंतराव भागवत चौक, सी.डी.ओ. बॅरेक नं.१, नरिमन पॉईंट, मुंबई -२० येथे प्रकाशित केले. संपादक : गणेश हाके, संपर्क : ०२२-२२०२२०५०

# महाराष्ट्रातील महाविजय देशाच्या राजकारणात परिवर्तन घडविणारा!

● **अमित शाह,** केंद्रीय गृहमंत्री

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी शिर्डी येथील अधिवेशनात केलेल्या भाषणाचा संपादित अंश...



**काही** निवडणुका देशाच्या राजकारणात परिवर्तन घडविणाऱ्या असतात. महाराष्ट्राच्या निवडणुकीतील हा महाविजय देशाच्या राजकारणास नवी दिशा देणारा ठरणार असून याची इतिहासात नोंद होणार आहे. पक्षाचे समर्पित कार्यकर्ते हे या महाविजयाचे खरे शिल्पकार आहेत. या देशात सिद्धान्ताची राजनीतीच चालेल हे दाखवून परिवारवादी राजकारणास महाराष्ट्राने जोरदार चपराक लगावली आहे. महाराष्ट्रातील हा महाविजय म्हणजे कार्यकर्त्यांचे समर्पण आणि मेहनतीचे फळ असून यापुढेही भाजपच्या विजययात्रेत महाराष्ट्र सर्वात पुढे राहील.

राजमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करतो. महाराष्ट्राने नेहमीच देशाचे नेतृत्व केले आहे. शरद पवार यांनी १९७८ पासून सुरू केलेल्या दगाफटक्याची राजनीती २० फूट जमिनीखाली गाडली आहे, उद्धव ठाकरेंनी २०१९ मध्ये बाळासाहेबांची विचारधारा सोडून दगा देत खोटारडेपणाने मुख्यमंत्रीपद मिळविले, त्यांना त्यांची जागा दाखवून दिली, महाराष्ट्राच्या विजयातून एक मजबूत आणि देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील स्थिर सरकार देण्याचे काम महाराष्ट्राच्या जनतेने आणि कार्यकर्त्यांनी केले आहे.

विधानसभेच्या निवडणुकीआधी शरद पवार पत्रकारांना निकालाचे भविष्य समजावून सांगत होते, आता निवडणुकीत काय झाले ते मी शरद पवार यांना समजावून सांगतो. महाराष्ट्रातील विभागवार विजयी उमेदवारांची यादी पाहिली की तुम्हाला आपण कोठे पराभूत झालो हे कळेल. आमच्या सहयोगी पक्षांनाही या महाविजयातून महाराष्ट्राच्या जनतेने मजबूत केले असून एकनाथ शिंदे यांची शिवसेना हीच बाळासाहेबांची शिवसेना आहे, अजित पवार यांची राष्ट्रवादीच खरी राष्ट्रवादी आहे, हेही सिद्ध केले आहे, धोकेबाजीची राजनीती करणाऱ्या शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांना घरी बसविण्याचे काम केले आहे.

महाराष्ट्राच्या जनतेने पुन्हा एकदा पंतप्रधान मोदीजींच्या राजनीतीला मान्यता दिली, सनातन संस्कृतीचा स्वीकार केला, हे सिद्ध झाले. २०२४ मध्ये मोदीजी सलग तिसऱ्यांदा पंतप्रधान झाले. हरयाणात आपण सलग तिसरा विजय प्राप्त केला, याच वर्षात आंध्रात 'रालोआ'चा विजय झाला, ओडिशामध्ये प्रथमच पूर्ण बहुमताचे आपले सरकार स्थापन झाले. २०२४ मध्येच सिक्कीममध्ये तिसऱ्यांदा एनडीएला विजय मिळाला आणि त्याच वर्षात महाराष्ट्रात सलग तिसऱ्यांदा सत्ता मिळाली. हे वर्ष भाजपाच्या इतिहासात नोंदले जाईल, पण आम्ही एवढ्यावर थांबणार नाही. दुसरीकडे इंडिया आघाडीत दुफळी माजली आहे, संपूर्ण



## बूथवरचा प्रत्येक कार्यकर्ता हा भाजपाचा सेनापती

**आमचा बूथवरचा प्रत्येक योद्धा कार्यकर्ता हाच आमचा सेनापती आहे. निवडणुकीमुळे महाराष्ट्रातील संघटनपर्व काहीशा विलंबाने सुरू झाले आहे. ४० लाख सदस्य झाले आहेत, दीड कोटींचे लक्ष्य आहे. कार्यकर्त्यांनी यासाठी कटिबद्ध राहून येत्या दीड महिन्यांत दीड कोटींहून अधिक सदस्य बनवावेत आणि प्रत्येक बूथचे शक्तिकेंद्रात परिवर्तन करावे. येत्या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत विरोधकांना एकही जागेवर विजय मिळणार नाही याची खबरदारी घ्या. संपूर्ण विजय हाच खरा विजय असतो. विरोधकांना एकही जागेवर विजय मिळू न देता पंचायतीपासून पार्लमेंटपर्यंत सर्वत्र विजयाचे सूत्रधार व्हावे यासाठी आपण एकत्र आलो आहोत. तो प्राप्त करणारच. प्रत्येक जागेवर विजय आणि प्रत्येक नागरिकास सदस्यत्व हा संकल्पही प्रत्यक्षात आणा. मजबूत भाजपा हे कार्यकर्त्यांचे लक्ष्य आहे. पन्नाप्रमुखापासून बूथ अध्यक्ष ते प्रदेशाध्यक्षापर्यंत प्रत्येकाने आपली सारी शक्ती संघटनेसाठी पणाला लावावी, लाडक्या बहिणी, शेतकरी, या सर्वांना सदस्य बनवू, आणि भविष्यात कोणीही आपला विश्वासघात करण्याची हिंमत करणार नाही अशी मजबूत पक्षउभारणी करून सर्वत्र भाजपला विजयी करू व राष्ट्र प्रथम हा संकल्प साकार करू या.**

इंडिया आघाडी खिळखिळी झाली असून महाराष्ट्रातील भाजपाच्या महाविजयामुळेच त्यांचा आत्मविश्वास संपला आहे. मोदीजींच्या नेतृत्वात भाजपा एकामागून एक विजय मिळवत असून दिल्लीतही भाजपाचे सरकार येईल. २०२४ ची अखेर भाजपाच्या विजयाने झाली आणि २०२५ ची सुरुवातही भाजपाच्या विजयानेच होईल. २०४७ पर्यंत भारत हे संपूर्ण विकसित, सुरक्षित, समृद्ध राष्ट्र बनवण्याचा हा संकल्प आहे. विकसित महाराष्ट्राखेरीज हे स्वप्न साकार होणार नाही. कारण महाराष्ट्र आणि मुंबई हे विकासाचे केंद्र आहे. आगामी काळात मोदीजींच्या नेतृवात असा महाराष्ट्र घडवू आणि विश्वासघात करण्याची कोणाची हिंमतही होणार नाही. या विजयाबद्दल मी सर्व कार्यकर्त्यांचे पुन्हा अभिनंदन करतो. विजयाची ही यात्रा अशीच अखंडपणे सुरू राहील आणि महाराष्ट्रातही भाजपा अजेय ठरेल, असा विश्वास व्यक्त करतो.

जलयुक्त शिवारच्या माध्यमातून महाराष्ट्र दुष्काळमुक्त करण्याचा संकल्प देवेंद्र फडणवीस यांनी सोडला होता. आता दुसऱ्या कार्यकाळात नरेंद्र मोदी आणि देवेंद्र फडणवीस मिळून हा संकल्प पूर्ण करतील, प्रत्येक शेतात सिंचनाचे पाणी खेळेल. शरद पवार महाराष्ट्रात मुख्यमंत्री झाले, केंद्रात मंत्री झाले, पण त्यांना जे जमले नाही, ते आम्ही करून दाखविणार आहोत. आम्ही जे बोलतो, ते करून दाखवितो, ही आमच्या पक्षाची परंपरा आहे. विरोधकांनी आता पाहातच रहावे. आम्ही दिलेले प्रत्येक आश्वासन पूर्ण केले आहे. अयोध्येतील रामलल्लाची मुक्तता






**महाराष्ट्राविना राष्ट्रगाडा न चाले**

**सेनापती बापटांनी महाराष्ट्राचे महत्व योग्य शब्दांत सांगितले आहे. अशा महाराष्ट्राला पुढे नेण्याचे काम आपल्याला करावयाचे आहे. गडचिरोली, शक्तिपीठ महामार्ग, पुणे मुंबई मेट्रो विकास, समृद्धी महामार्ग, सांगली, जालना, संभाजीनगरातील विकास अशी अनेक कामे पाच वर्षांत भाजपा सरकार पूर्ण करून राज्याला समृद्ध करेल, यात शंका बाळगू नका.**

करण्याची ग्वाही आम्ही दिली होती, कलम ३७० समाप्त करण्याची ग्वाही दिली होती, ती पूर्ण केली आहे, देशातून दहशतवाद संपविला. ३१ मार्च २०२६ पर्यंत देशातील नक्षलवादही संपवू, अशी ग्वाही मी तुमच्या साक्षीने देतो. गरीब कल्याण हा आमचा संकल्प आहे. सात कोटी गरीबांना घर, गॅस, वीज, धान्य, पाणी आणि आरोग्य सुविधा देण्याचे कामही भाजपा सरकारने केले आहे. ■

# शिर्डी अधिवेशन क्षणचित्रे














ज्येष्ठ नेते व केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनीही अधिवेशनात मार्गदर्शन केले. प्रदेश अध्यक्ष व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे, राष्ट्रीय सह संघटन मंत्री शिवप्रकाश, खा. नारायण राणे, प्रदेश कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण, विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर, विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, विधानसभा निवडणूक व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रावसाहेब दानवे, मुंबई अध्यक्ष आशिष शेलार यांचे राधाकृष्ण विखे-पाटील, आ. मोनिका राजळे, आ. शिवाजी कर्डीले, आ.विक्रम पाचपुते, जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर यांनी स्वागत केले.



# महाविजय कार्यकर्त्यांना समर्पित

● **देवेंद्र फडणवीस,** मुख्यमंत्री

महाविजय अधिवेशनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या मार्गदर्शनाचा संक्षिप्त अंश...



**ज्यांच्यामुळे** हा भगवा फेटा घालू शकलो, ज्यांच्यामुळे उद्याची पहाट ही कशी असेल हे कुणालाही माहिती नव्हती, तेव्हा शिवरायांना देव देश आणि धर्म लिहिण्याची प्रेरणा दिली, त्या जिजाऊंच्या चरणी नतमस्तक होतो. **'उत्तिष्ठत जाग्रत प्राप्य वरान्निबोधत'** म्हणजे उठा, जागे व्हा आणि जोपर्यंत विजय मिळत नाही तोपर्यंत थांबू नका, असा मंत्र देणाऱ्या स्वामी विवेकानंदांना मी अभिवादन करतो. सर्वप्रथम महाराष्ट्रात जो महाविजय मिळाला त्याबद्दल मी तुम्हा सर्वांना उभ्या उभ्या दंडवत घालतो कारण तुमच्यामुळेच हा महाविजय मिळाला आहे. आपल्या सर्वांच्या वतीने मी आपले नेते अमित शाह यांचे आभार मानतो. कारण या निवडणुकीत, या लढाईत २४ तास आपल्या सोबत उभे होते. लोकसभा निवडणुकीनंतर पार्टी हताश झाली होती. कार्यकर्त्यांना कळत नव्हते की काय चुकले ज्यामुळे असा पराभव झाला. त्यानंतर अमितभाईंनी महाराष्ट्राचा दौरा केला. हजारो कार्यकर्त्यांना भेटत मार्गदर्शन केले, त्यांच्या मनात विजयाचा विश्वास निर्माण केला. त्यांच्या मार्गदर्शनामुळे संपूर्ण पक्ष उभा राहिला आणि आपण हा महाविजय खेचून आणला. त्यासाठी अमित शाह यांचे मी खूप खूप आभार मानतो.

भारतीय जनता पक्षात श्रद्धा आणि सबुरी हा मंत्र पाळला जातो. ज्यांना हा मंत्र समजला ते यशस्वी झाले, ज्यांना नाही समजलं त्यांची निवडणुकीत हालत 'बुरी' झाली. मकरसंक्रमण संपून महाकुंभाचे अमृत घेण्यासाठी हजारो लोक एकत्र येत आहेत. आपण पाहतो की जसं जी-२० असतं, जी-७ असतं. तसं भाजपाचं जी-६ तयार झालं, म्हणजे जे लगातार तीन वेळा जिंकले त्या राज्यांच्या म्हणजे गुजरात, मध्य प्रदेश, गोवा, छत्तीसगड आणि हरयाणाबरोबर आता महाराष्ट्र देखील सहभागी झाला आहे. लोकसभेच्या निवडणुकीत जेमतेम ३५ टक्के मार्क घेऊन आपण काठावर पास झालो होतो. मात्र, त्यानंतर विधानसभेला २८८ पैकी २३७ जागा आपण जिंकल्या आणि ८२ टक्के गुण मिळवले. भाजपाने तर ८९ टक्के गुण मिळवले आणि आपला पक्ष मेरिटमध्ये पास झाला. निवडणुकीच्या युद्धामध्ये केशवाची भूमिका कार्यकर्त्यांनी निभावली. निवडणुकीच्या युद्धामध्ये कार्यकर्ते केशव होते तर मोदीजी माधव होते. महाराष्ट्राच्या जनतेने सलग तिसऱ्यांदा भाजपाला शंभरहून अधिक जागा दिल्या. गेल्या ३० वर्षात ही कामगिरी करणारा भाजप एकमेव पक्ष आहे. लोकसभेत आपल्या १७ जागा निवडून आल्या. पण त्यानंतर आपण प्रयत्न केले. भाजपाने आजवरच्या सत्ताधारी पक्षाच्या संख्येचा रेकॉर्ड मोडला. या विजयाचे शिल्पकार महाराष्ट्रातील भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते आहेत, हा विजय मी कार्यकर्त्यांना समर्पित करतो.

लोकांची सेवा करणे ही राज्यकर्ता म्हणून आमची आणि कार्यकर्ता म्हणून तुमची जबाबदारी आहे. आपण सुखासीन झालो तर हा लोकांनी दिलेल्या जनमताचा



## आपण सुखासीन झालो तर तो जनदेशाचा अपमान ठरेल

**लोकांची सेवा करणे ही राज्यकर्ता म्हणून आमची आणि कार्यकर्ता म्हणून तुमची जबाबदारी आहे. महाविजयामुळे आपण सुखासीन झालो तर हा लोकांनी दिलेल्या जनमताचा अवमान ठरेल. त्यामुळे लोकांमध्ये जावून त्यांचे प्रश्न आणि समस्या सोडविणे याला आपण प्राधान्य दिले पाहिजे.**

अवमान ठरेल. लोकसभेच्या काळात संविधान विरोधी शक्ती, अराजकतावादी शक्तींचा प्रभाव महाराष्ट्रात होता. काँग्रेस, शरद पवारांचा पक्ष आणि उबाठाने राज्यात व्होट जिहाद केला. निवडणुकीत पराभव केला तरी ते शांत बसले नाहीत. आपल्या समोर आव्हान आहेत, बांग्लादेशी खोट्या कागदपत्रांच्या आधारे मतदार याद्यांमध्ये घुसत आहेत. महाराष्ट्रात व्होट जिहाद भाग दोन सुरू झालाय. म्हणूनच पंतप्रधान नरेंद्र मोदीजींनी निवडुकीत एक गुरूमंत्र दिला, 'एक हैं तो सेफ हैं' पंतप्रधान नरेंद्र मोदींजींनी हे सांगितलं आणि ते निवडणुकीत खरं ठरलं.

आपण एक नवीन महाराष्ट्र घडवतोय. महाराष्ट्राची गती आता कमी होणार नाही. महाराष्ट्राला कायम दुष्काळमुक्त करण्यासाठी नदीजोड प्रकल्प हाती घेतले आहेत. महाराष्ट्राला पाणीदार करण्याचे स्वप्न आपले सरकार बघत आहे. शेतकऱ्यांना सौरउर्जेच्या माध्यमातून जन्मभर मोफत वीज मिळाली पाहिजे आणि महाराष्ट्रातला शेती सुजलाम सुफलाम झाला पाहिजे. सौरकृषी वाहिनी प्रकल्पाच्या माध्यामातून महाराष्ट्रात एक नवीन क्रांती आपण घडवतोय. २०३० सालापर्यंत ५२% वीज ही महाराष्ट्रातील अपारंपारिक उर्जास्त्रोतातून येईल आणि विजेचे भाव देखील कमी करण्याचा प्रयत्न सुरू आहे. समाजात दुफळी माजवण्याचा प्रयत्न हाणून पडायचा आहे. सरकारप्रमाणे पक्षालाही शंभर दिवसांचा कार्यक्रम द्या. त्यातील पहिले उद्दिष्ट दीड कोटी सदस्य संख्या बनवणे असावे, अशी विनंती मी प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे केली आहे. आपण सुरु केलेल्या योजना आपण बंद करणार नाही. मंत्रालयात येताना काम घेऊन या. फक्त स्टेटस म्हणून येऊ नका. सरकारचे कार्यक्रम खालपर्यंत कसे जातील यासाठी काम करावे लागेल. या योजना सर्वसामान्यांच्या जीवनातील दुःख दूर करण्याचे साधन आहे. स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुका तीन-चार महिन्यात येतील. सुप्रीम कोर्टाचा निकाल येणं बाकी आहे. विधानसभेत विजय मिळवला तर येणाऱ्या निवडणुकीत सुद्धा विजय मिळवायचा आहे. मी हा संपूर्ण विजय महाराष्ट्रातल्या भारतीय जनता पक्षाच्या या सगळ्या कार्यकर्त्यांना समर्पित करतो आणि तुम्हाला साष्टांग दंडवत करतो. तुमच्यामुळे आज आपण हा विजय प्राप्त करू शकलो. आज आपण हे महाविजयाचे अधिवेशन घेतले आहे हे सगळ्यांचे आभार मानण्यासाठी घेतले आहे. जे काही घोषणापत्रात सांगितलेले आहे ते देखील पूर्ण करण्याचा प्रयत्न निश्चितपणे करणार आहोत. लाडक्या बहिणींना मदत करतोय, यापुढेही करणार आहे. आता सरकार आलेले आहे. या महाराष्ट्रमध्ये फेक नरेटिव्ह, व्होट जिहाद आपण बघितलं पण गेल्या सहा महिन्यामध्ये आपल्या सर्व राष्ट्रीय विचारांच्या संघटनांनी एकत्रित येऊन आपल्या खांद्याला खांदा लावून राष्ट्रवादाचा पुन्हा रोपण केले आहे. जनतेनी सोपवलेली जबाबदारी आपल्याला पूर्ण करायची आहे. जनतेच्या अपेक्षा पूर्ण करण्याचे काम पक्षाच्या लोकप्रतिनिधींनी आणि पदाधिकाऱ्यांनी करावं, हे पुन्हा सांगतो. ■

# दीड कोटी सदस्य नोंदणीचे लक्ष्य गाठायचे आहे

● **विनोद तावडे**, राष्ट्रीय सरचिटणीस

सध्या आपले संघटन पर्व सुरू आहे. यानिमित्त सदस्य नोंदणीचे अभियान सुरू करण्यात आले आहे. सदस्य नोंदणी अभियानामुळे पक्ष संघटनेला कशी गती मिळेल, याविषयी राष्ट्रीय सरचिटणीस व सदस्य नोंदणी अभियानाचे राष्ट्रीय संयोजक विनोद तावडे यांनी उपस्थित प्रतिनिधींना मोलाचे मार्गदर्शन केले. या मार्गदर्शनाचा संपादित अंश...



**येथे** आलेल्या सर्वांनी साईबाबांचे दर्शन घेतले आहे. बाबांचा संदेश आहे श्रद्धा आणि सबुरी. मोठ्या विजयानंतर आता संघटना आणखी बळकट करण्याच्या उद्देशाने आपल्याला काम करायचे आहे. मोठे यश मिळवल्यानंतर काही जणांच्या मनात प्रश्न येतो की आता काय उरलंय? जिंकलो की आपण. पण खऱ्या कार्यकर्त्यांच्या मनात विचार येतो की, निवडणुकीत विजय मिळवणे, हा आपला उद्देश नाही. तर महाराष्ट्रासाठी काहीतरी करून दाखवणं, हे आमचं लक्ष्य आहे. हा संघटनेचा संदेश आपल्याला जाणून घ्यायचा असून येत्या काळात त्या दिशेने आपल्याला काम करायचे आहे. हे काम करत असताना सगळ्यात महत्वाची गोष्ट आपण लक्षात घेतली पाहिजे की, आपले विरोधक अस्तित्वाची लढाई लढताहेत, आपल्याला २०१४ ला इतका मोठा विजय मिळेल असं विरोधकांना वाटलं नव्हतं. पुन्हा २०१९ ला आपण येऊ हे पण त्यांना वाटलं नव्हतं, २०२४ ला लोकसभा निवडणुकीत आपल्या जागा कमी झाल्यामुळे विरोधक खुश झाले होते. पण हरयाणा, महाराष्ट्र ही राज्ये जिंकल्यानंतर भाजपाची राष्ट्रवादी विचारधारा या देशातून, राज्यातून कशी संपवायची, यासाठी सगळे विरोधक कामाला लागले आहेत. शिवसेनाप्रमुख माननीय बाळासाहेब ठाकरे यांचे चिरंजीव पक्षप्रमुख उध्दव ठाकरे मुसलमानांबद्दल असं काही बोलून मतांसाठी लोटांगण घालतील असं कधी वाटल होतं का? पण सगळ्या शक्ती आता एकत्र येताहेत. आशिषजींनी सांगितलं त्याप्रमाणे अर्बन नक्षलवादी, वेगळ्या प्रकारचे कम्युनिस्ट असतील हे सगळे आपल्या विचारधारा बाजूला ठेवून भाजपाचा विजयी रथ थांबवण्याचा प्रयत्न करताहेत. म्हणूनच मोठा विजय मिळवल्यानंतर आपण शांत न बसता आपल्याला संघटना बांधण्याच्या कामाकडे लक्ष द्यावे लागणार आहे.

लोकांनी आपल्याला स्वीकारलंय आहे, पण या समर्थनाला सक्रिय स्वरुपात आणण्याची जबाबदारी आपल्या कार्यकर्त्यांची आहे. छत्रपती शिवाजी महाराजांप्रमाणे मिळवलेला विजय हा तटबंदी करून जपून ठेवला पाहिजे. शत्रूला पुढच्या २५ वर्षांत आत प्रवेश करता येता कामा नये. या साठीची सुरूवात आपल्याला करायची आहे. त्यासाठीच आपल्याला सदस्यता मोहिम सुरु करायची आहे. ज्यावेळी देशपातळीवर सदस्यता मोहिम सुरू केली त्यावेळी ५० दिवसात **(शेष पान २१ वर)**

# नवा महाराष्ट्र घडवू...

● चंद्रशेखर बावनकुळे, प्रदेश अध्यक्ष व महसूल मंत्री

> दिनांक २३ नोव्हेंबेर २०२४ हा दिवस महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या अभूतपूर्व निकालाचा साक्षीदार ठरला. जनतेने भारतीय जनता पक्षाला सलग तिसऱ्यांदा बहुमत देत पक्षनेतृत्वावर विश्वास व्यक्त केला. या अनुषंगाने नक्कीच म्हणता येईल की, महाराष्ट्रात विकासाचे राजकारण, सुशासन आणि खऱ्या सामाजिक न्यायाचा विजय झाला, ज्यामुळे 'विकसित भारत' या निर्धाराला आणखी बळकटी मिळाली.



**हा** विजय खोट्या कथनांचा, जातीय राजकारणाचा आणि विरोधकांच्या दिशाभूल करणाऱ्या प्रचाराचा डोंगर पार करत मिळवला आहे. भाजपने सातत्याने 'सबका साथ सबका विकास' घोषवाक्याला धरून काम केले आणि विविध समाज, प्रदेशांमधील लोकांचा विश्वास जिंकून महाराष्ट्रातील आतापर्यंतचा सर्वोत्तम, म्हणजे १३२ जागांवर विजय मिळवला.

महाराष्ट्रातील १४ कोटी जनतेने आमच्यावर विश्वास दाखवल्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. हा विजय भाजपच्या ३५ लाखांहून अधिक कार्यकर्त्यांचा आहे. या योद्ध्यांसोबत काम करणे आणि एक मजबूत पक्षसंघटना उभी करणे, ही माझ्यासाठी अत्यंत अभिमानाची आणि आपुलकीची बाब आहे. घरदार विसरून, अथक परिश्रम करून कोट्यवधी मतदारांपर्यंत पोहोचणाऱ्या भाजपच्या प्रत्येक कार्यकर्त्याचा मला सार्थ अभिमान आहे. मी त्यांच्या प्रामाणिक निष्ठेसमोर नतमस्तक आहे.

नागपूर जिल्ह्यातील कोराडी येथील कामगारांच्या प्रश्नांसाठी आवाज उठवणारा एक सामान्य कार्यकर्ता म्हणून मी राजकीय प्रवास सुरू केला. कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसताना एका लहान शेतकरी कुटुंबातून आलेला मुलगा भाजपचा प्रदेशाध्यक्ष म्हणून कार्य करू शकतो, हीच या पक्षाची खासियत आहे. माझ्या नियुक्तीपासून मी पक्षाच्या मूळ तत्वांशी निष्ठावंत राहिलो आहे. मी पक्षादेशाला कायम सर्वोच्च प्राधान्य दिले आहे आणि कार्यकर्त्यांची एकता व त्यांच्या कल्याणासाठी स्वतःला समर्पित केले आहे.

सन २०२४ च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी आम्ही बूथ समित्यांवर लक्ष केंद्रित करून निवडणूक मोहीम सुरू केली. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या 'मेरा बूथ सबसे मजबूत' या निर्देशानुसार राज्यातील बूथ समित्या मजबूत आहेत आणि शेवटच्या मतदारापर्यंत पोहोचण्यासाठी सक्रियपणे काम करत आहेत, याची खात्री आम्ही केली. बूथ समिती, शक्ती केंद्र प्रमुख, विस्तारक, सुपर वॉरिअर्स, सोशल मीडिया संयोजक यांच्यासह हजारो कार्यकर्ते, संघटनेतील पदाधिकारी यांच्यासह माझे विधिमंडळातील सर्व आजी-माजी सहकारी निवडणुकीच्या रिंगणात कार्यरत होते.

पक्षाचे अध्यक्ष जे. पी. नड्डा, गृहमंत्री अमित शहा यांनी प्रत्येक पावलावर आम्हाला खंबीर साथ दिली. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, राष्ट्रीय सह संघटनमंत्री शिवप्रकाश, निवडणूक प्रभारी व केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव, सहप्रभारी केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव आणि राष्ट्रीय स्तरावरील सर्व ज्येष्ठ नेत्यांच्या मार्गदर्शनामुळे आम्हा सर्वांचा उत्साह उंचावत गेला.

देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली आम्ही संपूर्ण महाराष्ट्रात प्रचार केला. फडणवीस यांची निवडणूक नियोजनातील सूक्ष्मता आणि कार्यकर्त्यांचे मनोबल वाढवण्यातील उत्कटता आम्ही अनुभवली. फेक नॅरेटिव्ह, अफवा आणि शेलक्या भाषेतील प्रचार, विखारी शब्द, अघोरी टीका हे सारेच प्रचारयुद्ध महाभयानक होते. मी राज्यभरात ९० हून अधिक ठिकाणी सभा घेतल्या. महाराष्ट्रातील सर्व २८८ विधानसभा मतदारसंघांच्या निवडणूक प्रमुखांच्या नियुक्त्या केल्या. संघटनात्मक पद्धतीने महायुतीला सोबत घेऊन निवडणुकीत मोठा विजय कसा प्राप्त करता येईल, यासाठी योजना आखण्यात आल्या. या निवडणुकीत तंत्रज्ञानाचा पुरेपूर वापर करण्यात आला आणि जमिनीशी नाळ जोडलेल्या कार्यकर्त्यावरही तितकाच भर देण्यात आला.

आम्ही ऑगस्ट २०२४मध्ये संवादयात्रा सुरू केली. त्याअंतर्गत सर्व विधानसभा, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि नगरपालिकांसह ७५० ठिकाणी अधिवेशने आयोजित केली. समाजातील शेवटच्या व्यक्तीपर्यंत पोहोचलो. त्यांना केंद्रातील भाजपच्या नेतृत्वाखालील सरकारच्या योजनांची माहिती दिली. लाडकी बहीण आणि शेतकऱ्यांसाठीच्या योजनांनी कार्यकर्त्यांचा आत्मविश्वास वाढवला. विचार परिवाराने मोलाची भूमिका पार पाडली. त्यांनी घरोघरी संपर्क केला. महाराष्ट्रात महायुतीचे सरकार का हवे, याची माहिती दिली.

सन २०२३ मध्ये आम्ही तीन कोटी लोकांपर्यंत पोहोचण्याच्या उद्देशाने 'घर चलो' मोहीम सुरू केली. प्रत्येक विधानसभेत सुमारे ५०,००० लोक 'सरल ॲप'वरती नोंदणीकृत केले. ओबीसींच्या सर्वांगीण विकासासाठी आणि त्यांच्या फायद्यासाठी आम्ही 'ओबीसी जागर यात्रा' सुरू केली. पंतप्रधान मोदी यांची २०१४ पासूनची कामगिरी लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी आम्ही 'संपर्क से समर्थन' ही मोहीम सुरू केली.

लोकसभा निवडणुकीच्या काळातही संघटन नियोजन आणि प्रचारासाठी मी संपूर्ण महाराष्ट्र पिंजून काढला. अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर हा माझा तिसरा राज्य प्रवास होता. एकूण १४७ बैठका, ८६ निवडणूक नियोजन बैठका आणि ६९ जाहीर सभा आयोजित केल्या. माझ्या प्रवासात विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली आम्ही संघटन नियोजन आणि संवादावर भर दिला. राज्यातील जवळपास प्रत्येक लोकसभा मतदारसंघात 'नमो संवाद सभां'चे आयोजन करण्यात आले. जिल्हा आणि तालुका पातळीवर संघटना विस्ताराच्या दृष्टीने विशेष लक्ष दिले. विविध कार्यशाळा, प्रशिक्षण सत्रे आणि पक्षाचा विचार अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी कार्यक्रमांचे आयोजन केले. व्यापक सदस्य नोंदणी मोहिमा राबवून पक्षाचा जनाधार वाढवला. अनेक नेत्यांचे पक्षप्रवेश घडवून आणले आणि नियुक्त्या करून पक्षाच्या विविध पदांवर योग्य व्यक्तींना स्थान दिले. जवळपास प्रत्येक जिल्ह्यात कार्यकर्ता संवाद बैठका घेण्यात आल्या आणि अनेक ठिकाणी निवडणुकांच्या दृष्टीने नवीन 'वॉर रूम' उघडण्यात आल्या. हे सर्व करताना विविध समाजघटकांना एकत्रित आणून सामाजिक समरसतेच्या मार्गावर पक्षाची बांधणी करण्याचा मी प्रामाणिक प्रयत्न केला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली मला महसूल मंत्रिपद भूषविण्याची संधी मिळाली आहे. जनतेची आणि भारतीय जनता पक्षाची सेवा करण्यासाठी जनता जनार्दन मला कायम शक्ती देवो, अशी माझी इच्छा आहे. शिर्डीच्या महाअधिवेशनातून नवे अंकुर फुलवायचे आहेत. येणारा काळ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा आहे. मागच्या वर्षाने नेत्यांची निवडणूक पाहिली. कार्यकर्त्यांनी नेत्यांना विजयी केले. आता ज्यांच्यामुळे महायुतीचे सरकार आले, त्या कार्यकर्त्यांना विजयी करायचे आहे. १२ जानेवारी हा दिवस आम्हा सर्वांचे प्रेरणास्थान असलेल्या तेजःपुंज व्यक्तित्वाची जयंती आहे. १२ जानेवारीला स्वामी विवेकानंदांची जयंती म्हणजे 'युवा दिन' आणि राजमाता जिजाऊ माँसाहेबांची जयंती आहे. या दिवशी साईबाबांच्या श्रद्धा व सबुरीचा शिकवण देणाऱ्या भूमीतून प्रेरणा व आशीर्वाद घेवून आम्ही विकसित भारताच्या जोडीला नवा महाराष्ट्र घडविण्याच्या संकल्प करणार आहोत. ■

# शांतता, विकासाचे नवे पर्व

नूतन इंग्रजी वर्षाच्या प्रारंभी गडचिरोली जिल्ह्यातील जहाल नक्षली ताराक्कासह ११ नक्षलवाद्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत आत्मसमर्पण करत संविधानाचा मार्ग स्वीकारला. या ११ नक्षलवाद्यांना पकडण्यासाठी पोलीस यंत्रणेने १ कोटी रु.पेक्षा अधिक रकमेची बक्षिसे जाहीर केली होती. लगतच्या छत्तीसगड सरकारनेसुद्धा या नक्षलवाद्यांना पकडण्यासाठी इनाम जाहीर केले होते. संपूर्ण देश नक्षलवाद मुक्त करण्याच्या मोदी सरकारच्या निर्धाराला महाराष्ट्राने गेल्या १० वर्षात मोठ्या ताकदीने साथ दिली आहे.

**नक्षलवाद्याचे** मूळ त्या भागातील जनतेपर्यंत आजवर पोहचू न शकलेला विकास, धनदांडग्या प्रस्थापितांकडून होणारे अत्याचार यात दडले आहे. माओवाद्यांनी पद्धतशीरपणे या भागातील भोळ्याभाबड्या आदिवासी जनतेत संविधान आणि सरकारबद्दल पराकोटीचा अविश्वास निर्माण केला. केंद्रीय अथवा राज्य पोलीस यंत्रणेमार्फत नक्षलवाद्यांना जेलबंद करून या भागातील हिंसाचार थांबणार नाही, हे ओळखून मोदी सरकारने राज्य सरकारांच्या सहकार्याने नक्षलग्रस्त भागात गोरगरीब, वंचित जनतेपर्यंत विकास योजना पोहचवण्याचा कार्यक्रम युद्धपातळीवर हाती घेतला आहे. मोदी सरकारच्या आणि राज्य सरकारांच्या प्रयत्नांना हळूहळू आणि निश्चित स्वरूपाचे यश मिळत आहे. नववर्षाच्या प्रारंभीच गडचिरोलीत झालेले आत्मसमर्पण हे सरकारच्या प्रयत्नांना मिळालेले मोठे यश आहे.



११ नक्षलवाद्यांचे आत्मसमर्पण एकीकडे होत असताना दुसरीकडे गडचिरोली जिल्ह्यातील विकासाच्या नव्या पर्वालाही प्रारंभ झाला. गडचिरोली जिल्ह्यातील अहेरी ते गर्देवाडा या मार्गावरील राज्य परिवहन महामंडळाच्या बससेवेचा प्रारंभ मुख्यमंत्री फडणवीस यांच्याहस्ते झाला. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ७७ वर्षांनी या भागात एसटी धावली. या अतिदुर्गम भागात रस्त्यांचे जाळे तयार करून तेथील जनतेला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याच्या निर्धारपूर्वक प्रयत्नांना त्या भागातील जनतेकडून तितक्याच सकारात्मक पद्धतीने प्रतिसाद मिळेल, यात शंका नाही. २०१४ ते २०१९ या काळात मुख्यमंत्री असताना देवेंद्र फडणवीस यांनी नक्षलग्रस्त भागात नक्षलवाद्यांविरोधातील मोहीम आणखी तीव्र केली. या प्रयत्नांना विकास प्रकल्पांची जोड देऊन या भागातील जनतेचे आणि भरकटलेल्या युवा पिढीचे मत परिवर्तन करण्यात सरकारी यंत्रणेने कालबद्ध कार्यक्रमातून यश मिळू लागले आहे. गेल्या ६ महिन्यात २७ जहाल नक्षलवादी हिंसाचाराचा मार्ग सोडून मुख्य प्रवाहात आले आहेत. आत्मसमर्पण करणाऱ्या या सर्वांना भविष्यकाळातील आयुष्यासाठी ८६ लाख एवढी आर्थिक मदत करण्यात आली आहे. गेल्या ४ वर्षात गडचिरोली जिल्ह्यातील एकही तरुण किंवा तरुणी नक्षलवाद्यांच्या गटात सहभागी झालेली नाही, ही मोठी उपलब्धी आहे.



२०२४ मध्ये या भागातील पोलीस यंत्रणांच्या कारवाईत २४ नक्षलवादी ठार झाले, तर १८ माओवाद्यांना अटक करण्यात आली. पोलीस आणि अन्य सरकारी यंत्रणांच्या प्रयत्नांमुळे गडचिरोली जिल्ह्यातील गावकरी नक्षलवाद्यांच्या विरोधात सामुहिकपणे आवाज उठवू लागले आहेत. ११ गावांमध्ये नक्षलवाद्यांना प्रवेशास बंदी करण्यात आली आहे. काही वर्षांपूर्वी नक्षलवाद्यांच्या दहशतीमुळे पोलीस आणि अन्य सरकारी यंत्रणांना सहकार्य करण्यास कोणीही पुढे येत नव्हते. आता परिस्थिती हळूहळू बदलू लागली आहे. आपल्याला संविधानाच्या मार्गानेच न्याय मिळू शकतो, हे नक्षलग्रस्त भागातील युवापिढीला कळू लागले आहे. माओवाद्यांकडून गडचिरोलीसारख्या नक्षल्यांच्या प्रभाव क्षेत्रातील भागात युवापिढीला लक्ष्य करून युवकांच्या मनात संविधानाबद्दल अविश्वास निर्माण करण्याचे काम केले जाते. न्याय मिळण्यासाठी हातात बंदूकच घ्यावी लागेल, हे माओवाद्यांकडून युवकांच्या मनात ठसवले जाते. माओवाद्यांचा हा अपप्रचार खोडून काढण्यात केंद्रीय सुरक्षा यंत्रणांनी मोठी भूमिका बजावली आहे.

मोदी सरकारने अंत्योदयाच्या विविध योजनांचे लाभ शेवटच्या घटकांपर्यंत पोहचवण्यासाठी नक्षलवाद्यांच्या प्रभाव असलेल्या भागात एक खिडकी योजनेसह विविध उपाययोजना सुरू केल्या आहेत. त्याअंतर्गत या भागातील नागरिकांना अधिवासाचे प्रमाणपत्र तसेच आवश्यक असणारी अन्य सर्व शासकीय प्रमाणपत्रे त्वरेने देण्यासाठी शासनाच्या सर्व यंत्रणा कार्यरत आहेत. बेरोजगारी आणि नक्षलग्रस्त भागातील हिंसाचार याचा जवळचा संबंध असल्याने या भागातील तरुणांना व्यवसायिक कौशल्य, प्रशिक्षण, व्यवसाय सुरू करण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन पुरविण्याचे काम केंद्र व राज्य सरकारच्या विविध खात्यांमधील समन्वयामुळे कार्यक्षमतेने होऊ लागले आहे. एकट्या गडचिरोली जिल्ह्यातील १० हजारांपेक्षा तरुण-तरुणींना व्यवसाय कौशल्य कार्यक्रमाचा फायदा झाला आहे. याचा परिणाम नक्षलवादी संघटनांत भरती होणाऱ्या तरुण-तरुणींच्या संख्येत मोठ्या प्रमाणात घट झाली आहे.

गडचिरोली जिल्ह्यासारख्या अतिदुर्गम भागात 'लॉईड्स' या कंपनीच्या विविध उद्योग प्रकल्पांचा प्रारंभ श्री. फडणवीस यांच्याहस्ते झाला. ६ हजार कोटी रूपयांच्या या प्रकल्पातून नक्षलग्रस्त भागात सुमारे ९ हजार रोजगार निर्माण होतील, असा अंदाज आहे. याखेरीज देशात प्रथमच 'ग्रीन मायनिंग'चा प्रारंभ गडचिरोली जिल्ह्यात करण्यात आला. 'ग्रीन मायनिंग' संकल्पतेमुळे या भागातील खाणींचे संरक्षण होणार असून कार्बन उत्सर्जनही कमी होणार आहे. अशा विकास प्रकल्पांमुळे सुटू लागलेला बेरोजगारीचा प्रश्न, अप्रत्यक्ष फायद्यातून उपलब्ध झालेले रोजगार यामुळेही या भागातील जनतेच्या मनात असलेला गैरसमज दूर होत आहे. केंद्र आणि राज्य सरकारच्या एकत्रित प्रयत्नांमुळे २०२६ पर्यंत देश नक्षलवाद मुक्त करण्याची मोदी सरकारची घोषणा प्रत्यक्षात उतरेल, यात काही शंका नाही. ■

# आणिबाणीत घटना दुरुस्ती करुन कॉंग्रेसने लोकशाहीचा गळा घोटला

● माधव भांडारी, प्रदेश उपाध्यक्ष (मुख्यालय)

**एकोणचाळीसावी घटना दुरुस्ती – १० ऑगस्ट १९७५**

ह्या दुरुस्तीने कलम ७१ व ३२९ ही दोन कलमे बदलली गेली, ३२९अ असे नवे कलम घुसडले गेले. त्याचबरोबर सरकारने केलेल्या विशिष्ट कायद्यांना न्यायालयीन छाननीपासून संरक्षण देणाऱ्या सूची क्र. ९ मध्ये बदल केले गेले.


इंदिरा गांधींची निवडणूक अवैध ठरवणारा अलाहाबाद उच्च न्यायालयाचा निकाल रद्दबातल करण्यासाठी ही घटना दुरुस्ती केली गेली. एवढेच नाहीतर पंतप्रधानपद न्यायालयीन चिकित्सेच्या कक्षेतून कायमचे बाहेर काढले गेले. कितीही निवडणूक गैरप्रकार झाले तरीही राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, लोकसभा सभापती व पंतप्रधान यांच्या विरुद्ध दावा दाखल करता येणार नाही अशी तरतूद या दुरुस्तीने केली होती.

**चाळीसावी घटना दुरुस्ती – २७ मे १९७६**

ह्या दुरुस्तीने राज्य सरकारांच्या अधिकारांचा आणखी संकोच केला गेला. 'विशेष आर्थिक क्षेत्र' जाहीर करून विकसित करण्यासाठी राज्य सरकारला बाजूला सारून थेट कायदा करण्याचे अधिकार संसदेला देण्यात आले. सर्व प्रकारची खनिजे ही राष्ट्रीय संपत्ती घोषित करून त्याबद्दलचे निर्णय घेण्याचे अधिकार केंद्र सरकारने स्वत:कडे घेतले. भू संपादन व जमिनींशी संबंधित कायदे ९ क्रमांकाच्या सूचीत टाकून राज्य सरकारांचे व न्यायालयांचे अधिकार आणखी कमी केले गेले.

**एक्केचाळीसावी घटना दुरुस्ती – ७ सप्टेंबर १९७६**

घटनेच्या ३१६ व्या कलमात दुरुस्ती करून राष्ट्रपती, पंतप्रधान व राज्यपाल हे त्या त्या पदांवरून मुक्त झाले अथवा निवृत्त झाले तरी त्यांच्याविरुद्ध कोणत्याही प्रकारचा गुन्हा नोंदवता येणार नाही अशी व्यवस्था केली गेली.



**बेचाळीसावी घटना दुरुस्ती – १ सप्टेंबर १९७६ ते १ एप्रिल १९७७**

भारतीय संविधानाच्या इतिहासात बेचाळीसावी घटनादुरुस्ती 'लघु संविधान' (Mini Constitution) म्हणून ओळखली जाते. 'अनुभवांच्या आधारे घटनादुरुस्तीच्या गरजेचा अभ्यास करण्यासाठी' (to study the question of amendment of the Constitution in the light of experience) पंतप्रधान इंदिरा गांधींनी तेव्हाचे परराष्ट्रमंत्री स्वर्णसिंग यांच्या अध्यक्षतेखाली जुलै १९७६ मध्ये एक समिती नेमली. या समितीने दिलेल्या अहवालाच्या आधारे १ सप्टेंबर १९७६ रोजी ह्या दुरुस्तीचे विधेयक लोकसभेत मांडले गेले. हे विधेयक एका फटक्यात संविधानाची प्रस्तावना, कलम ३१ पासून ३६६ पर्यंतच्या कलमांपैकी ३१, ३१क, ३९, ५५, ७४, ७७, ८१, ८२, ८३, १००, १०२, १०३, १०५, ११८, १४५, १५०, १६६, १७०, १७२, १८९, १९१, १९२, १९४, २०८, २१७, २२५, २२६, २२७, २२८, ३११, ३१२, ३३०, ३५२, ३५३, ३५६, ३५७, ३५८, ३५९, ३६६, ३६८ आणि ३७१फ अशी एकंदर

सत्तेचाळीस कलमे बदलणार होते. त्याशिवाय ४अ, १४अ, ३१ड, ३२अ, ३९अ, ४३अ, ४८अ, १३१अ, १३९अ, १४४अ, २२६अ, २२८अ आणि २५७अ अशी तेरा नवी कलमे समाविष्ट करणार होते. चार कलमांना पर्यायी कलमे देणार होतेआणि केंद्र राज्य संबंधांची व्याख्या करून राज्यांचे अधिकार निश्चित करणारी सातवी सूची बदलणार होते. राज्यांचे अधिकार कमालीचे संकुचित करणाऱ्या तरतुदी या विधेयकात होत्या. एकूणच केंद्र सरकार सर्वंकष सत्ताधारी होईल अशी रचना या दुरुस्तीच्या मदतीने केली जाणार होती. ह्याच घटना दुरुस्तीच्या मदतीने १९७५ सालातच अपेक्षित असलेल्या लोकसभा व विधानसभांच्या निवडणुका पुढे ढकलून लोकसभा व विधानसभांची मुदत एक वर्षासाठी वाढवली गेली. राष्ट्रपतींना आवश्यक वाटल्यास ही स्थगिती अधिक वाढवण्याची तरतूद त्यात होतीच.

आपले संविधान तयार करण्यासाठी मूळ घटना समितीने जवळ जवळ तीन वर्षे काम केले होते. त्या समितीत ३८९ सभासद होते. पण 'अनुभवांच्या आधारे त्या संविधानात काय दुरुस्त्या करायला हव्या आहेत' ते ठरवण्यासाठी इंदिरा गांधींनी केवळ एका सदस्याची समिती नेमली आणि त्या समितीने अवघ्या एक-दीड महिन्यात आपला अहवाल दिला. त्या अहवालाच्या आधारावर एवढे सर्वंकष बदल करण्याचा घाट इंदिरा गांधी व काँग्रेसने घातला. भारतीय राज्यघटनेचे मूळ स्वरूप पूर्ण बदलून टाकणारे हे बदल होते. या बदलांमुळे राज्यांचे अधिकार अत्यंत कमी होणार होते व आपल्या राज्यघटनेने स्वीकारलेले संघराज्याचे तत्व झुगारून देऊन सर्वंकष सत्ता केंद्र सरकारच्या हातात एकवटणार होती.

नागरिकांचे मूलभूत अधिकार काढून घेण्याचे काम ३८व्या घटना दुरुस्तीने केलेच होते. पण ते पुरेसे वाटत नसल्यामुळे ४२व्या दुरुस्तीच्या माध्यमातून 'नागरिकांचा जगण्याचा अधिकार सुद्धा काढून घेण्याचे अधिकार' सरकारला दिले गेले. जनतेचे सर्व प्रकारचे आचार, विचार, प्रचार स्वातंत्र्य, आंदोलन करण्याचा हक्क देखील हिरावून घेतले गेले. वृत्तपत्र स्वातंत्र्यावर तर कधीच घाला घालून झाला होता. प्रसिद्ध होणारी ओळ न ओळ सरकारी तपास यंत्रणेकडून मान्यता घेऊनच प्रसिद्ध केली पाहिजे हा दंडक रूढ झाला होता. न्याययंत्रणा सरकारच्या निर्देशानुसार काम करेल हेही या दुरुस्तीने स्पष्ट केले.

जगाच्या पाठीवर कुठेही कोणी केलेले नाही असे संविधानाच्या प्रस्तावनेत दुरुस्ती करण्याचे अजब काम या दुरुस्तीच्या माध्यमातून केले गेले. संविधान सभेने खूप व्यापक चर्चेनंतर 'समाजवाद व Secular' हे शब्द घटनेत समाविष्ट करायला नकार दिला होता. ती भूमिका पं.नेहरूंपासून डॉ.आंबेडकरांपर्यंत सर्वांची होती. पण इंदिरा गांधी व काँग्रेसने संविधान सभेची ती मूळ भूमिकाच मोडीत काढली आणि 'समाजवाद व Secular' हे शब्द कोणत्याही चर्चेशिवाय घटनेच्या प्रस्तावनेत घुसडले. इंदिरा गांधी व काँग्रेस एवढ्या व्यापक दुरुस्त्या करून घटनेचा मुख्य ढाचा पूर्णपणे बदलून टाकत असताना संसदेतील विरोधी बाकांवर कोणी नव्हते. कारण ते सर्व तुरुंगात होते. स्टालिन आणि माओची कार्यपद्धती वापरून त्यांच्या विचारांच्या दिशेने जाण्याचा तो आजवरचा सर्वात मोठा प्रयत्न होता. पं.नेहरू आणि इंदिरा गांधी ह्यांच्या कारकिर्दीत झालेल्या अनेक घटना दुरुस्त्या घटनेचा मूळ गाभा बदलणाऱ्या होत्या.

राजीव गांधी यांनी सुद्धा त्यांच्या पावलावर पाऊल टाकून secularismला हरताळ फासणारी कायदादुरुस्ती शाह बानो प्रकरणात केली. ही दुरुस्ती तर संविधानाच्या आत्म्याच्या पूर्ण विरोधात होती. एकूणच पहिल्या दुरुस्तीपासून वृत्तपत्रे, विरोधक व न्यायालये ह्यांच्यावर नियंत्रण आणू पाहणाऱ्या सर्व दुरुस्त्या ह्या नेहरू गांधी खानदान व काँग्रेसने केल्या आहेत. संविधानाचा मूळ ढाचा बदलण्याचा प्रयत्न त्यांनी पुनः पुनः केला. मात्र ही वस्तुस्थिती लपवून ठेवून काँग्रेस आणि त्यांचे डावे सहप्रवासी उलटा अपप्रचार सातत्याने करतात.

आपल्या संविधानात आजवर केल्या गेलेल्या दुरुस्त्यांच्या आधारे तपासून पाहिले तर हे सहज स्पष्ट होईल की भारताच्या घटनेचा मूळ ढाचाच बदलून टाकण्याचा प्रत्येक प्रयत्न नेहरू गांधी खानदानाने केलेला आहे. 'आरक्षण रद्द करण्याची' भाषा वापरणारे राहूल गांधी देखील त्याच मार्गाने जात आहेत. त्यांच्या मनात संविधानाबद्दल यत्किंचितही आदर नाही हे त्यांनी पुन्हा पुन्हा दाखवून दिले आहे. त्यामुळे आपल्या संविधानाला खरा धोका नेहरू गांधी खानदान व त्यांची बटिक असलेल्या काँग्रेसपासून आणि त्यांना साथ देणाऱ्या सर्व सरंजामदारांपासूनच आहे.

**(समाप्त)**

# पं. नेहरुंनी केलेल्या उपेक्षेमुळेच राजीनाम्याचा निर्णय घेतला

## केंद्रीय मंत्रीपदाचा राजीनामा देताना डॉ. आंबेडकरांनी व्यक्त केली होती खंत

● सुजीत भोगले

> पंडित नेहरू यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना केंद्रीय कायदे मंत्रीपदी राहू नये, अशी परिस्थिती पद्धतशीरपणे तयार केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रगाढ बुद्धिमत्तेचा देशहितासाठी वापर करून घेण्याऐवजी पंडित नेहरूंनी डॉ. आंबेडकरांना स्वतंत्रपणे काम करण्यास वाव दिला नाही. त्यांना चांगले खातेही दिले नाही. यामुळेच डॉ. आंबेडकरांनी राजीनामा देणे पसंत केले.



**मी** आता चौथ्या प्रकरणाचा संदर्भ घेईन ज्याचा माझ्या राजीनाम्याशी चांगला संबंध आहे. सध्या मंत्रिमंडळ हे केवळ समित्यांनी घेतलेल्या निर्णयांचे रेकॉर्डिंग आणि नोंदणी कार्यालय बनले आहे. मी म्हटल्याप्रमाणे मंत्रिमंडळ आता समित्यांद्वारे काम करते. संरक्षण समिती आहे. परराष्ट्र समिती आहे. संरक्षणाशी संबंधित सर्व महत्त्वाच्या बाबी संरक्षण समितीद्वारे निकाली काढल्या जातात. या समितीत पंतप्रधान नियुक्त मंत्र्यांचेच गट काम करतात. मी या दोन्ही समितीचा सदस्य नाही. या समित्या लोखंडी पडद्यामागे काम करतात आणि मंत्रीमंडळ बैठकीत या समितींनी घेतलेल्या निर्णयांवर शिक्कामोर्तब होतो. समितीचे सदस्य नसणाऱ्या मंत्र्यांना या धोरणाच्या आखणीत काहीही सहभाग घेण्याची संधी मिळत नाही पण समितीच्या चांगल्या वाईट निर्णयांची सामुहिक जबाबदारी मात्र मंत्रिमंडळ सदस्य म्हणून स्वीकारावी लागते. ही अत्यंत चुकीची गोष्ट आहे.

हिंदू कोड बिल मंजूर व्हावे यासाठी मी अत्यंत आग्रही होतो कारण हिंदू समाज हा जातीभेद, लिंगभेद पाळतो त्यानुसार सामाजिक अधिकारांची संरचना केली गेली आहे आणि ही अन्याय्य आहे. या परिस्थितीत बदल घडवण्यासाठी हिंदू कोड बिल अत्यंत आवश्यक होते. ११ एप्रिल १९४७ रोजी हे विधेयक या सभागृहात मांडण्यात आले. पुढील चार वर्षांच्या कालखंडात त्यातील चार कलमे मान्य केली गेली आणि पुढे हे बिल पंतप्रधान, पक्षातील त्यांचे सहकारी आणि संसदीय कामकाज मंत्र्यांनी जाणीवपूर्वक पराभूत होईल याची काळजी घेतली. तो सगळा घटनाक्रम हा षड्यंत्र, एकटे पाडणे, खोटी आश्वासने देणे, विधेयकावर साधक बाधक चर्चा न होऊ देणे आणि विरोधी पक्ष या मुद्द्यावर सरकारला पराभूत करू शकतील असा खोटाच संभ्रम निर्माण करणे अशा सगळ्या मार्गांनी अंतिमतः त्याला थंड्या बस्त्यात टाकणे या पद्धतीने झाला आहे. या बिलाच्या मी समर्थनात आहे असे खोटेच प्रतिपादन स्वतः पंतप्रधानांनी तीन वेळेस केले आहे.

या विधेयकाच्या संदर्भात मला सर्वात मोठा मानसिक छळ सहन करावा लागला आहे. पक्ष यंत्रणेची मदत मला नाकारण्यात आली. पंतप्रधानांनी मतदानाचे स्वातंत्र्य दिले, ही पक्षाच्या इतिहासातील एक असामान्य गोष्ट आहे. यापैकी कशालाही माझी हरकत नव्हती. पण या बिलाच्या



संदर्भात विस्तृत चर्चा व्हावी. बिलाच्या सर्व पैलूंचा सांगोपांग विचार व्हावा. पण मला दोन गोष्टी अपेक्षित होत्या. पुरेसा वादविवाद झाल्यावर चीफ व्हीपला भाषणे आणि बंद करण्याच्या सूचनांवरील वेळेची मर्यादा म्हणून मला पक्षाच्या व्हिपची अपेक्षा होती. भाषणांवर वेळेची मर्यादा घालून विधेयक मंजूर झाले असते.

या बिलाला पारित करणे शक्य असतानाही त्याला जाणीवपूर्वक सडवले गेले. इतकेच नाही तर या बिलाला मागे टाकण्यासाठी काही कमी महत्वाची आणि नंतर मांडली असती तरी चालले असते अशा बिलांना जाणीवपूर्वक समोर आणले गेले. मी सतत पाठपुरावा करत होतो म्हणून नाईलाजाने अर्धेच बिल मांडण्याचा प्रस्ताव आला, तो सुद्धा मी स्वीकारला पण जाणीवपूर्वक हे कापलेले बिल सुद्धा वेळेअभावी मान्य होणार नाही याची काळजी घेतली गेली. पंतप्रधान बिल पारित करून घ्या सांगत आहेत आणि चीफ व्हीप मात्र त्यांचा आदेश धुडकावून लावत बिलाला टांगून ठेवत आहेत. त्यांनी असे करूनही पंतप्रधान त्यांच्यावर कारवाई करत नाहीत असे सगळे विचित्र प्रकरण सुद्धा या निमित्ताने मला पाहायला मिळाले. हे असंवैधानिक वर्तन असूनही, चीफ व्हिप हे खरोखरच पंतप्रधानांचे लाडके आहेत. निष्ठा नसतानाही त्यांना पक्ष संघटनेत बढती मिळाली. यावर मी एकच म्हणू शकतो की पंतप्रधान प्रामाणिक असले तरी हिंदू कोड बिल मंजूर करण्यासाठी लागणाऱ्या जिद्दीचा त्यांच्याकडे अभाव होता. अशा परिस्थितीत पुढे जाणे अशक्य आहे या निर्णयाप्रत मी आलो आहे.

त्यामुळे वेळेच्या आधारे विधेयक रद्द करण्याचा पंतप्रधानांचा निर्णय मी स्वीकारण्यास असमर्थ होतो. माझ्या आजारपणामुळे मी जात आहे असे काही लोकांनी सुचविल्यामुळे मला माझ्या राजीनाम्याचे हे विस्तृत स्पष्टीकरण देणे बंधनकारक आहे. आजारपणामुळे माझे कर्तव्य सोडणारा मी शेवटचा माणूस असेन.

ज्या कारणांचा उहापोह करून मी राजीनामा देतो आहे ती कारणे कालबाह्य वाटू शकतात परंतु कायदामंत्री या नात्याने बहुतेक वेळा राज्यघटनेच्या चौकटीत व्यस्त होतो. त्यामुळे २६ जानेवारी १९५० पर्यंत माझे सर्व लक्ष त्यावरच केंद्रित होते. त्यानंतर मी लोकप्रतिनिधी विधेयक आणि सीमांकन आदेश यांच्याशी निगडीत होतो. आमच्या परराष्ट्र व्यवहारात सहभागी होण्यासाठी मला फारसा वेळ मिळाला नाही. ही हातावरची कामे अपूर्ण ठेवून जाणे मला योग्य वाटले नाही.

हिंदू संहिता हा या देशातील विधिमंडळाने हाती

घेतलेला सर्वात मोठा सामाजिक सुधारणा उपाय होता. भारतीय विधिमंडळाने भूतकाळात संमत केलेला किंवा भविष्यात संमत होण्याची शक्यता असलेल्या कोणत्याही कायद्याची त्याच्या महत्त्वाच्या दृष्टीने तुलना करता येणार नाही. माझ्या मतभेदांना न जुमानता मी टिकून राहिलो हेच कारण आहे. त्यामुळे जर मी चूक केली असेल तर ते काही चांगले करण्याच्या आशेवर आहे.

पंतप्रधानांनी विधेयक मागे घेण्याची घोषणा केल्यानंतर मात्र मी असह्य होऊन राजीनामा देण्याचा निर्णय घेतला आहे. माझे मंत्रिमंडळातून बाहेर पडणे ही या देशातील कुणालाही फारशी चिंतेची बाब नाही. मी स्वतःशी प्रामाणिक असणे आवश्यक आहे आणि ही प्रामाणिकता मी या चौकटीच्या बाहेर पडल्याशिवाय दाखवणे अशक्य आहे. मी माझ्या मंत्री मंडळातील सहकाऱ्यांचे त्यांच्या सौजन्याबद्दल आभार मानतो. मी संसद सदस्यत्वाचा राजीनामा देत नसून फक्त मंत्रिमंडळातून बाहेर पडतो आहे, माझ्याबद्दल अत्यंत सहिष्णुता दाखविल्याबद्दल मी संसद सदस्यांचे आभार मानू इच्छितो.

**१० ऑक्टोबर १९५१.**

**हे राजीनामापत्र भारताच्या प्रत्येक नागरिकाने वाचले पाहिजे, यावर चिंतन मनन केले पाहिजे.**

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर भारताचे पहिले कायदा मंत्री होते. त्याच वेळेस पाकिस्तानचे प्रथम कायदामंत्री जोगेंद्रनाथ मंडल हे सुद्धा दलितच होते. जोगेंद्रनाथ मंडल यांनी आपल्या पदाचा राजीनामा आंबेडकरांच्या बरोबर एक वर्ष आधी दिला होता आणि नंतर ते तत्काळ भारतात परत आले आणि उर्वरित आयुष्य त्यांनी विजनवासात काढले. दोन्ही ठिकाणी दलितांना कायदामंत्री करण्याचे कारण काय?

कारण आम्ही दलितांचे कैवारी आहोत याचे प्रतिक म्हणून दोन्ही बाजूच्या नेत्यांनी नेमले होते. त्यांना केवळ प्रतिक बनवून ठेवणे आणि पडद्याआड आपल्याला हव्या त्या उचापती करणे हाच हेतू होता. मंडल यांनी कायदा मंत्री म्हणून काम सुरु केल्यावर पाकिस्तान इस्लामी राष्ट्र होण्याच्या दिशेने वाटचाल करतो आहे आणि आपल्याला ठेवून घेण्याचे आणि मंत्री बनवण्याचे कारण इथल्या दलित हिंदूंनी पाकिस्तान सोडून जाऊ नये हा हेतू होता हे त्यांच्या लक्षात आले. कारण इस्लामी राष्ट्रात साफ-सफाईचे काम करायला काफिरच लागतात. मंडल जर पाकिस्तानात थांबले नसते तर तिथे दलित सुद्धा थांबले नसते म्हणून जिनांनी ही शक्कल लढवली. हे सत्य समजल्यावर आणि पाकिस्तानात दलितांची अवस्था अत्यंत भयानक होणार आहे याची जाणीव झाल्यावर मंडल अस्वस्थ झाले आणि पदत्याग करून ते भारतात परत आले. आपल्यामुळे पाकिस्तानातील दलित हाल सहन करतो आहे ही बोच उर्वरित आयुष्य विजनवासात घालवताना त्यांना सहन करावी लागली. डॉक्टर आंबेडकर खूप बुद्धिमान होते आणि त्यांनी नेहरूंचे षड्यंत्र ओळखले होते. नेहरूंना सुद्धा जाणीव झाली होती की आपण आंबेडकरांना वापरून घेऊ शकत नाही आणि त्यामुळे त्यांच्यात संघर्ष निर्माण झाला. आंबेडकरांनी संविधानाचे काम झाल्यावर राजीनामा द्यावा हे नेहरूंचेच षड्यंत्र होते. कारण एकदा संविधान तयार झाले की नंतर आपल्याला हवे ते कायदे त्यात जोडणे किंवा अस्तित्वात असलेल्या कायद्यांच्या मध्ये सुधारणा करणे आपल्याला शक्य आहे हे नेहरूंना माहिती होते. एका दलित कायदेमंत्र्याच्या नेतृत्वाखाली संविधान समिती गठीत झाली आणि त्यांच्या नेतृत्वाखाली संविधान बनविले आहे हा मुद्दा आपल्यासह आपल्या पुढील पिढ्यांना कामाला येणार आहे हे नेहरूंना पक्के माहिती होते.

त्यामुळे आंबेडकरांच्या सारखा विद्वान सहकारी आपल्याला मनमानी करू देणार नाही. आपल्याला राबवायच्या असलेल्या प्रत्येक कुटील अजेंड्याला हा हाणून पाडेल याची नेहरूंना खात्री होती. संविधान बनवून झाले होते त्यामुळे आता आंबेडकरांची गरज संपली होती म्हणून हिंदू कोड बिल हा विषय जाणीवपूर्वक तुटेपर्यंत ताणून त्यांनी आंबेडकरांना राजीनामा द्यायला भाग पाडले.

हा निष्कर्ष पुढे सिद्ध पण होणार आहे. पुढील भाग वाचणे चुकवू नका.

तळटीप- काँग्रेस दलितांचा आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचा किती पराकोटीचा द्वेष करते आणि तितकेच प्रेम ते मुस्लिमांवर कसे करतात हे या लेखमालेतून सविस्तर मांडणार आहे. काँग्रेसचा दलितांचे कैवारी आणि बाबासाहेबांचे अनुयायी हा बुरखा या लेखमालेतून पुराव्यांसह टराटरा फाडला जाणार आहे.

**अभी तो प्याज की परते खुलना शुरू हुई है, अभी तो बहोत कुछ बाहर आनेवाला है.**

**(उत्तरार्ध)**

# ड्रोन प्रणालीमुळे सागरी सुरक्षा होणार भक्कम




राज्यातील सागरी क्षेत्रात होणारी अवैध मासेमारी तसेच घुसखोरी रोखण्यासाठी ड्रोनद्वारे देखरेख विशेष प्रणाली सुरु करण्यात आली आहे. या ड्रोन प्रणालीमुळे राज्यातील ७ जिल्ह्यातील ९ सागर किनाऱ्यांची सुरक्षा आणखी मजबूत होणार असल्याचे मत्स्यव्यवसाय व बंदर विकास मंत्री नितेश राणे यांनी सांगितले. मत्स्य आयुक्त कार्यालयात आयोजित कार्यक्रमात मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे यांच्या हस्ते ड्रोन देखरेख प्रणालीचे उद्घाटन करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

**मुख्यमंत्री** देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली विभागाचा पहिला १०० दिवसांचा आराखडा तयार केला असल्याचे सांगून मंत्री नितेश राणे म्हणाले की, ड्रोन यंत्रणा कार्यान्वित झाल्यानंतर राज्याच्या ७२० किलोमिटर लांबीच्या सागरी किनाऱ्यावरून राज्याच्या १२ मैल सागरी हद्दीपर्यंत बेकायदा मासेमारी करणाऱ्या अवैध नौकांवर ड्रोन कॅमेऱ्याद्वारे नजर ठेवली जाणार आहे. अशा अनधिकृत नौकांची माहिती घेऊन त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यासाठी ड्रोन वेब सोल्युशन्स स्ट्रिमिंगचा पुरावा म्हणून वापर केला जाणार आहे. त्यामुळे अवैध मासेमारीला चाप बसणार आहे. ड्रोन यंत्रणेमुळे राज्यातील सागरीक्षेत्र हे कॅमेऱ्याच्या नियंत्रणात येणार आहे. त्यामुळे अवैध मासेमारीला आळा घालणे शक्य होणार आहे.

श्री. राणे म्हणाले, बाहेरून येणाऱ्या ट्रॉलर्स, मोठ्या बोटी, यामुळे स्थानिक मच्छीमारांचे मोठे नुकसान होते. स्थानिकाच्या उत्पन्नात घट होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्नही निर्माण होतो. त्यावर नियंत्रण मिळावे, जरब बसावी यासाठी आधुनिक तंत्र प्रणालीच्या माध्यमातून सकारात्मक पाऊल उचलण्याच्या दृष्टीने मत्स्य व्यवसाय

विभागाने ड्रोनच्या माध्यमातून पहिले पाऊल टाकले आहे. ड्रोन हे सागरी पोलीस विभागाशी समन्वय साधून वापरण्यात येणार असल्याने सागरी सुरक्षा बळकट होण्यास मदत होणार आहे. ड्रोनचा वेग जास्त असल्याने एकाचवेळी अधिक क्षेत्र ड्रोनच्या देखरेखाली येणार आहे. एका दिवसात १२० सागरी मैलाचे सर्वेक्षण करण्यात येईल. तसेच एका दिवसात सहा तास सर्वेक्षण करणे बंधनकारक असेल. ड्रोनमधून प्राप्त झालेली माहिती संबंधित जिल्हा कार्यालयात उपलब्ध करून दिली जाईल. मेक इन इंडिया अंतर्गत हे ड्रोन विकसित करण्यात आले आहे. या माध्यमातून समुद्रात होणाऱ्या हालचालींवर लक्ष ठेवण्यात येणार असून अवैधरित्या मासेमारी करणाऱ्यावर कारवाई करून जास्तीत जास्त दंड आकारला जाणार आहे. या ड्रोनच्या माध्यमातून छायाचित्रे उपलब्ध होणार आहेत. हे सर्व पुरावे विभागास प्राप्त होऊन कारवाई करण्यास गती मिळणार असल्याचे मंत्री श्री. राणे यांनी सांगितले. केंद्र व राज्य सरकारच्या मत्स्य व्यवसाय कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येणार असल्याचेही मंत्री श्री.राणे यांनी सांगितले. समुद्रकिनारा लाभलेल्या राज्यापैकी ड्रोनद्वारे देखरेख प्रणाली विकसित करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य असल्याचेही त्यांनी नमूद केले. यावेळी ड्रोनद्वारे देखरेख प्रणालीचे प्रात्यक्षिक झाले. यासाठी मत्स्य आयुक्त कार्यालय येथे कंट्रोल रूम उभारण्यात आला आहे.

### ७ जिल्ह्यांतून होणार ९ ड्रोनचे उड्डाण

पालघर जिल्ह्यातील शिरगाव, ठाणे जिल्ह्यातील उत्तन, मुंबई उपनगर जिल्ह्यातील गोराई, मुंबई शहर जिल्ह्यामधील ससून गोदी, रायगड जिल्ह्यातील रेवदंडा, श्रीवर्धन, रत्नागिरी जिल्ह्यातील मिरकरवाडा, साखरी नाटे तर सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगड या नऊ समुद्रकिनाऱ्यावरून ९ ड्रोन उडवले गेली.


यावेळी आमदार मनीषा कायंदे, कृषी व पदुम विभागाचे सचिव रामास्वामी एन, मत्स्यव्यवसाय आयुक्त पंकज कुमार, सागरी सुरक्षा पोलीस उपायुक्त अश्विनी पाटील, मत्स्य व्यवसाय उपायुक्त दिपाली बनकर, यासह सात ठिकाणी उपस्थित असलेले मत्स्य व्यवसाय विभागाचे अधिकारी दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे उपस्थित होते. ■

# दीड कोटी सदस्य नोंदणीचे लक्ष्य गाठायचे आहे

(शेष पान १० वरून)

११ कोटीचा आकडा आपण पार केला. २०१४ मध्ये यासाठी सहा महीने लागले होते. २०२४ ला आपण हा आकडा ५० दिवसात पार केला. आज आपण साडे तेरा कोटी सदस्य संख्येपर्यंत आलो आहोत. कार्यकर्त्यांनी जीव तोडून केलेल्या कामामुळेच हे शक्य झाले. काम करताना संसद ते सरपंच अशा सगळ्या लोकप्रतिनिधींनी आपल्या मतदारसंघाचं लक्ष्य काय असेल हे ठरवलं पाहिजे. लोकप्रतिनिधींप्रमाणे प्रदेशअध्यक्षांपासून शक्ती केंद्रप्रमुख, मंडल पदाधिकारी या सगळ्यांनी आपल्या क्षेत्रात किती वेळेत सदस्यता मोहिम पूर्ण करणार याची मुदत ठरवणे गरजेचे आहे. ५० टक्क्यांपेक्षा कमी मतं मिळालेल्या बूथमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीमध्ये ५० टक्क्यांवर मते मिळवण्याची कामगिरी सदस्यता अभियानातून साध्य करता येईल. महिला, युवक, शेतकरी या सगळ्यांपर्यंत सदस्य अभियान राबवून पुढच्या आठ दिवसात करुन दीड कोटीचा आकडा पूर्ण करायचा असेल तर दररोज १२ लाख ५० हजार सदस्य आपल्याला केले पाहिजे. जिंकलेल्या १३४ मतदारसंघातून प्रत्येकी ९ हजार सदस्य दररोज झाले पाहिजेत. तर सर्व २८८ मतदारसंघातून ५ हजार सदस्य झाले पाहिजेत. संविधान सन्मान अभियान आपण चालवत आहोत. धर्माच्या आधारावर आरक्षण दिले पाहिजे हा काँग्रेसचा आग्रह होता. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळे राज्यघटनेत धर्माच्या आधारावर आरक्षण देण्याची तरतूद झाली नाही. काँग्रेसला धर्माच्या आधारावर आरक्षण द्यायचे आहे. या अभियाना अंतर्गत घरा-घरात पोहचून आरक्षणाबाबत काँग्रेसची भूमिका लोकांपर्यंत पोहोचवायची आहे. मा. अटल बिहारी वाजपेयी यांची जन्मशताब्दी सुरू आहे. यानिमित्त वर्षभर वेगवेगळे कार्यक्रम होणार आहेत. कुशल प्रशासक अशी अटलजींची ओळख होती. ज्यावेळी अटलजींचे सरकार एक मतांनी पडलं, त्यावेळी मुंडे साहेबांनी एक मताची व्यवस्था केली होती. पण अटलजी त्यावेळी म्हणाले होते की, आपल्या बरोबर जे आहेत त्यांच्याबरोबरच सरकार टिकवायचे आहे. फोडाफोडी करुन सरकार टिकवायचे नाही. पण पुढच्या निवडणुकीत आपले सरकार बहुमताने आले. अशा अनेक गोष्टी आपल्याला लोकांपर्यंत पोहोचवायच्या आहेत. ■

# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते विविध रेल्वे प्रकल्पांचे उद्‌घाटन




पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून विविध रेल्वे प्रकल्पांचे उद्धाटन आणि पायाभरणी केली. पंतप्रधानांनी नवीन जम्मू रेल्वे डिव्हीजनचे उद्धाटन केले. त्यांनी ईस्ट कोस्ट रेल्वेच्या रायगडा रेल्वे डिव्हीजनच्या इमारतीची पायाभरणी केली. याप्रसंगी पंतप्रधान मोदी यांनी केलेले भाषण...

**श्री गुरु** गोविंद सिंगजी यांच्या जयंतीनिमित्त शुभेच्छा देत, पंतप्रधानांनी त्यांची शिकवण आणि जीवन, सशक्त आणि समृद्ध राष्ट्राच्या संकल्पनेला प्रेरणा देते, असे सांगितले. कनेक्टिव्हिटीमध्ये भारताच्या वेगवान प्रगतीची प्रशंसा करत, पंतप्रधान मोदी यांनी सांगितले की, २०२५ च्या सुरुवातीपासूनच, भारत १००० किलोमीटर पेक्षा जास्त मेट्रो रेल्वे जाळ्याचा विस्तार करून आपल्या उपक्रमांना गती देत आहे. यावेळी त्यांनी काल सुरू झालेल्या दिल्ली- मेट्रो प्रकल्पासहित अलीकडेच उद्धाटन झालेल्या दिल्ली-एनसीआरमधील नमो भारत ट्रेनचा उल्लेख केला. जम्मू आणि काश्मीर, ओदिशा आणि तेलंगण येथे सुरु करण्यात आलेल्या प्रकल्पांमुळे देशाच्या उत्तर, पूर्व आणि दक्षिणेकडच्या भागातील आधुनिक कनेक्टिव्हिटीमध्ये एक मोठी झेप घेतल्याने संपूर्ण देशाने एक पाऊल पुढे टाकल्याचा दाखला आजचा कार्यक्रम देत आहे, असे मोदी म्हणाले. 'सबका साथ, सबका विकास' हा मंत्र विकसित भारताचे स्वप्न प्रत्यक्षात आणण्यास मदत करत असल्याचा पुनरुच्चार त्यांनी केला. या विकास प्रकल्पांबद्दल त्यांनी या

राज्यांतील लोकांचे आणि भारतातील सर्व नागरिकांचे अभिनंदन केले.

देशभरात समर्पित फ्रेट कॉरिडॉरसारख्या आधुनिक रेल्वे नेटवर्कचे काम वेगाने सुरू असल्याचे पंतप्रधानांनी अधोरेखित केले. या विशेष कॉरिडॉरमुळे नियमित रेल्वेमार्गावरचा ताण कमी होतो आणि जलदगती रेल्वेगाड्यांसाठी अधिक संधी निर्माण होत आहेत. मेड इन इंडिया प्रकल्पाला गती देण्याबरोबरच रेल्वेमध्ये कायापालट होत आहे, असे पंतप्रधानांनी सांगितले. मेट्रो आणि रेल्वेसाठी आधुनिक डब्यांची निर्मिती केली जात आहे. स्थानकांचा पुनर्विकास केला जात आहे, स्थानकांवर सौर पॅनेल बसवले जात आहेत आणि रेल्वे स्थानकांवर एक स्थानक एक उत्पादन स्टॉल्स उभारले जात आहेत. या सर्व उपक्रमांमुळे रेल्वे क्षेत्रात लाखो नवीन रोजगाराच्या संधी निर्माण होत आहेत. गेल्या दशकभरात, रेल्वेमध्ये लाखो तरुणांना कायमस्वरूपी सरकारी नोकऱ्या मिळाल्या आहेत. नवीन रेल्वेगाडीचे डबे तयार करणाऱ्या कारखान्यांमध्ये कच्च्या मालाच्या मागणीमुळे इतर क्षेत्रातही नोकरीच्या संधी मिळतात, असे ते म्हणाले. रेल्वेशी संबंधित विशेष कौशल्ये लक्षात घेत देशात पहिल्या गती शक्ती विद्यालयाची स्थापना करण्यात आली आहे. जसजसे रेल्वेचे नेटवर्क विस्तारात आहे, नवीन विभाग आणि नवीन मुख्यालये उभारण्यात येत आहेत, त्यामुळे जम्मू, काश्मीर, हिमाचल प्रदेश, पंजाब आणि लेह-लडाख या प्रदेशांना लाभ होत आहे. रेल्वेविषयक पायाभूत सेवा सुविधांमध्ये जम्मू काश्मीर नवीन टप्पे गाठत आहे, उधमपूर-श्रीनगर-बारामुल्ला रेल्वे मार्गाविषयी संपूर्ण देशभरात चर्चा आहे. चिनाब या जगातील सर्वाधिक उंचीवर असलेल्या रेल्वे कमान सेतूच्या निर्मितीमुळे हा प्रदेश उर्वरित भारताशी जोडण्यात महत्वाची भूमिका बजावेल आणि लेह लडाख मधील लोकांना सुविधा मिळेल. देशातील पहिला केबल-आधारित रेल्वे पूल असलेला अंजी खड्ड पुल देखील याच प्रकल्पाचा एक भाग असल्याचे त्यांनी सांगितले. चिनाब पुल आणि अंजी खड्ड पुल हे या प्रदेशात आर्थिक प्रगती आणण्याचे आणि समृद्धीला चालना देण्याचे अभियांत्रिकीचे एक अद्वितीय उदाहरण आहे. विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करण्याच्या देशाच्या दृढतेचा पंतप्रधानांनी पुनरुच्चार केला. हे उद्दिष्ट साध्य करण्यात भारतीय रेल्वेचा विकास केंद्रस्थानी आहे. गेल्या दशकभरात, भारतीय रेल्वेत ऐतिहासिक परिवर्तन घडून आले आहे, त्यामुळे देशाची प्रतिमा बदलली आहे आणि नागरिकांचे मनोबलही लक्षणीयरित्या उंचावले आहे, असे पंतप्रधान पुढे म्हणाले. भारतीय रेल्वेचा विकास चार महत्त्वाच्या मानकांनुसार होत आहे यावर पंतप्रधानांनी भर दिला. ही मानके- पहिले, रेल्वेच्या पायाभूत सुविधांचे आधुनिकीकरण; दुसरे, प्रवाशांसाठी आधुनिक सुविधांची तरतूद; तिसरे, देशाच्या कानाकोपऱ्यात रेल्वे संपर्काचा विस्तार; आणि चौथे, रोजगाराच्या संधी निर्माण करणे तसेच रेल्वेच्या माध्यमातून उद्योगांना पाठिंबा, असेही ते म्हणाले. आजचा कार्यक्रम हा या दृष्टीकोनाचा दाखला आहे. नवीन विभाग आणि रेल्वे टर्मिनल्सच्या स्थापनेमुळे भारतीय रेल्वेचे २१व्या शतकातील आधुनिक रेल्वेसेवेत रूपांतरित करण्यात महत्त्वपूर्ण योगदान मिळेल, असेही पंतप्रधान म्हणाले. या घडामोडी आर्थिक समृद्धीच्या परिसंस्थेला चालना देतील, रेल्वेचे कार्यान्वयन वाढवतील, अधिक गुंतवणुकीच्या संधी निर्माण करतील आणि नवीन रोजगार निर्माण करतील,हे पंतप्रधानांनी अधोरेखित केले.

वंदे भारत ट्रेन, अमृत भारत स्थानके आणि नमो भारत रेल्वेने भारतीय रेल्वेसाठी नवीन आदर्श स्थापित केला आहे, असे पंतप्रधान म्हणाले. आकांक्षी भारत आज कमी वेळेत अधिक उद्दिष्ट्ये साध्य करण्याचा प्रयत्न करत आहे, असेही ते म्हणाले. सध्या, वंदे भारत गाड्या ५० हून अधिक मार्गांवर चालत असून १३६ सेवा प्रवाशांना प्रवासाचा सुखद अनुभव देत आहेत. काही दिवसांपूर्वी, मी वंदे भारत ट्रेन आपल्या ट्रायल रनदरम्यान ताशी १८० किलोमीटर वेगाने धावणारी नवीन स्लीपर रेल्वे दाखवणारा व्हिडिओ पाहिला. अशा उपलब्धी प्रत्येक भारतीयाचे ऊर अभिमानाने भरून टाकतात, असे पंतप्रधान म्हणाले. या सर्व उपलब्धी म्हणजे केवळ सुरुवात असून भारत लवकरच आपली पहिली बुलेट ट्रेन धावण्याच्या घटनेचा साक्षीदार होईल, यावर पंतप्रधानांनी भर दिला. भारतीय रेल्वे प्रवाशांच्या प्रवासाचा अनुभव सुधारण्यावर भर देत असल्याचे पंतप्रधानांनी अधोरेखित केले. यासाठी देशभरातील १,३०० हून अधिक अमृत स्थानकांचे नूतनीकरण सुरू आहे. गेल्या दशकात रेल्वे संपर्कामध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. २०१४ मध्ये केवळ ३५% असलेले रेल्वे मार्गांचे विद्युतीकरण आज सुमारे १००% पर्यंत पोहोचले आहे. ■

# सशक्तीकरणाकडे...

● मिलिंद कानडे

> सध्या रुपयाचे कमी झालेले मूल्य आणि विदेशी वित्तसंस्थांचा भारतातून पाय काढता घेण्याची श्रुंखला यावरून बराच गदारोळ माजलेला आहे. रुपयाचे मूल्य घसरल्यामुळे भारतीय भांडवली बाजारातून परदेशी वित्त संस्था बाहेर पडताहेत की परदेशी वित्त संस्था बाहेर पडत असल्यामुळे रुपयाचे मूल्य घसरत आहे, हे समजून घेणे आवश्यक असतानाच ही संपूर्ण परिस्थिती दीर्घकाळ राहणारी असेल की तत्कालीक यावरही लक्ष केंद्रीत करण्याची गरज आहे.

**एखाद्या** चलनाची विदेशी चलनाच्या परिमाणात निर्धारित केलेली चालू किंमत कमी करणे म्हणजे तिचे मूल्य घटणे होय, असे म्हटले जाते. अशा स्थितीतही मूल्य कमी झालेल्या चलनाची अंतर्गत (स्वदेशातील) क्रयशक्ती कमी होत नाही, हे सर्वांनी समजून घ्यायला हवे. बरेचदा अशा प्रकारची मूल्य घट ही आंतरराष्ट्रीय देवघेवींच्या ताळेबंदातील मूलभूत असमतोल नाहीसा करण्यासाठी, निर्यातीत वाढ व आयातीत घट करण्यासाठीदेखील आवश्यक ठरते. उदाहरणार्थ एका डॉलरची वस्तू आयात करण्यास पूर्वी ४.७६ रुपये द्यावे लागत असल्यास, मूल्य घटल्यानंतर त्यासाठी ७.५० रुपये द्यावे लागतात. उलट अमेरिकेतील आयातदारास एका डॉलरमध्ये ४.७६ रुपयाच्या वस्तूऐवजी ७.५० रुपये किंमतीच्या वस्तू मिळतात. साहजिकच, यामुळे भारताची आयात कमी होण्यास आणि निर्यातीस चालना मिळण्यास मदत होते. त्यामुळे सध्या सुरू असलेल्या चलनाच्या मूल्यघटीकडे सरसकट नकारात्मक



नजरेने न पाहता त्यातून साध्य होऊ शकणारे सकारात्मक परिणामसुद्धा महत्त्वाचे ठरतात. परदेशी वित्त संस्थांची कार्यशैलीदेखील येथे विशेष भूमिका वठविते. या वित्त संस्था गुंतवणुकीच्या मोबदल्यात मिळणारा रेट ऑफ रिटर्न अर्थात परताव्याचा दर पाहत असतात. जिथे त्यांना परतावा अधिक वा चांगला मिळतो तिथे या संस्था वळत असतात. उगवत्या सूर्याला सर्वच नमस्कार करतात, ही जगाची रीत आहे. त्यानुरूप परदेशी वित्त संस्थादेखील वागत असल्यास त्यात काहीही नवल नाही. नेमकी हीच गोम अनेकांच्या लक्षात येत नसल्यामुळे भारतीय रुपयाच्या मूल्य घसरणीबाबत संभ्रम निर्माण करण्यात येत आहे. रुपया घसरण असतानाच त्या पाठोपाठ परदेशी वित्त संस्थाचे देशातून बाहेर पडणे यांचा संबंध जोडत जणू काही संपूर्ण भारतीय अर्थव्यवस्था आता मोडकळीस येणार असल्याचा अक्षरशः फेक नॅरेटिव्ह तयार करण्यात येत आहे. दुर्दैवाने फेक नॅरेटिव्ह तयार करणाऱ्या चांडाळचौकडीतून आपले आर्थिक धोरणसुद्धा सुटलेले नाही, हे या निमित्ताने आता उघड होऊ लागले आहे. असो. आजवरचा इतिहास पाहता भारतीय अर्थव्यवस्थेने कठीणातील कठीण परिस्थितीवर मात करत भरारी घेतली आहे. सध्या सुरू असलेली रुपयाची घसरण आणि त्या पाठोपाठ परदेशी वित्त संस्थांची माघार हीदेखील अशीच स्थिती आहे. ही परिस्थिती निश्चितच कायमस्वरूपी राहणारी नाही. त्यामुळे भारतीयांनी, येथील गुंतवणुकदारांनी भीती बाळगण्याचे काहीच कारण नाही.

रुपयाची सुरू असलेली घसरण आणि परदेशी वित्त संस्थांची माघार, त्यांचे परिणाम या संपूर्ण धबडग्यात भारताच्या शक्तीस्थळांकडे सर्रास दुर्लक्ष करण्यात येत आहे. भारतीय नागरिक विशेषत: इथला मध्यमवर्गीय नागरिक हा खऱ्या अर्थाने भारताचा आणि येथील अर्थव्यवस्थेचा दिशादर्शक आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. भारत हा आजही मध्यमवर्गाची मोठी क्रयशक्ती असलेला बाजारपेठ आहे. तांत्रिक कौशल्य असलेला विपूल युवा या देशात आहे. १०० कोटीहून अधिक नागरिकांची ही बाजारपेठ सहजासहजी हलणारी, ढळणारी निश्चितच नाही. ती स्वत: नवनव्या आव्हानांना पेलत दुसऱ्यांना आधार देणारी ठरली आहे.

आजघडीला छोट्या-छोट्या शहरांमधून भांडवली बाजारात चैतन्य निर्माण झाले आहे. प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष करांचे संकलन अपेक्षेहून अधिक होत आहे. सुदृढ अशी कृषि अर्थव्यवस्था ही अजून एक जमेची बाजू आहे. एकुणच सध्या सुरू असलेली रुपयाची घसरण आणि परदेशी वित्त संस्थांचे देशाबाहेर पडणे ही कायमस्वरूपी बाब नसून ती काही काळापुरती ठरणारी आहे. जेव्हा जेव्हा रुपया डॉलरपुढे नांगी टाकताना दिसलाय तेव्हा तेव्हा रिझर्व्ह बँकेने तिच्या पदरी असलेला डॉलरचा साठा खुला केला आहे. म्हणजेच डॉलरची विक्री करून रुपयाचे मूल्य सावरून धरले आहे. रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी काही दिवसांपूर्वी म्हटल्याप्रमाणे, ६७५ अब्ज डॉलरहून अधिक असलेली मध्यवर्ती बँकेची विदेशी चलन गंगाजळी हे सध्याच्या परिस्थितीतील भारताचे खूप मोठे सामर्थ्य आहे. मनीकंट्रोल डेटानुसार, आता भारतीय बाजारपेठेत एकूण ११ हजार ६६६ नोंदणीकृत एफपीआय अर्थात फॉरेन पोर्टफोलिओ इन्व्हेस्टर आहेत, जे ३१ डिसेंबर २०२३ रोजी ११ हजार १४३ आणि ३१ डिसेंबर २०२२ रोजी १० हजार ९७५ होते. कस्टोडियन बँकेनुसार, नवीन एफपीआय नोंदणीची प्रक्रिया अजूनही सकारात्मक असून सुमारे ४० ते ५० निधी लवकरच भारतात परवाने मिळविण्याच्या प्रक्रियेत आहेत. याचाच अर्थ भारतीय शेअर बाजारात परकीय गुंतवणूकदारांची जोरदार विक्री होत असून ही संख्या सतत वाढत आहे. याकडे आपण डोळेझाक करू शकत नाही, ही वास्तविकता आहे.

परदेशी संस्थांनी भारतीय शेअर बाजाराकडे दीर्घकालीन गुंतवणुकीच्या दृष्टीने न बघता, कमी कालावधीत नफा कमावण्याच्या दृष्टीने बघितले आहे. मागील काही महिन्यांचा विचार करता एकीकडे परदेशी वित्त संस्थांनी भारतीय शेअर बाजारात प्रचंड मोठ्या प्रमाणात विक्रीचा सपाटा लावलेला असताना दुसरीकडे त्याच काळात स्थानिक वित्त संस्थांनी प्रचंड प्रमाणात शेअर बाजारात गुंतवणूक केली. अवघ्या मे महिन्यात स्थानिक वित्त संस्थांनी ५५ हजार ७३३ कोटी रुपयांच्या शेअर्सची खरेदी केली. एप्रिल महिन्यात विदेशी वित्त संस्था नेट सेलर्स होत्या. म्हणजेच त्यांनी खरेदी केलेल्या शेअर्सपेक्षा विक्री केलेल्या शेअर्सचे मूल्य जास्त होते. या महिन्यामध्ये विदेशी वित्त संस्थांनी ३५ हजार ६९२ कोटी रुपयांच्या शेअर्सची विक्री केली. तर नेट बायर्स असलेल्या स्थानिक वित्त संस्थांनी एप्रिलमध्ये ४४ हजार १८६ कोटी रुपयांच्या शेअर्सची खरेदी केली. या आकडेवारीवरून विदेशी वित्त संस्थांच्या तुलनेत स्थानिक वित्त संस्थांनी शेअर बाजाराकडे खूपच सकारात्मक दृष्टीने पाहिलेले आहे.

कोणत्याही देशाची अर्थव्यवस्थेच्या आकाराचे मानक म्हणजे त्या देशाचा जीडीपी आणि गेल्या नऊ वर्षांत भारतानं जीडीपीमध्ये झेप घेतली आहे. २०१४ ते २०२४ दरम्यान भारताच्या जीडीपीमध्ये एकूण ८३ टक्के वाढ नोंदवली गेली आहे. या काळात भारत पाच देशांना मागे टाकत जगातील पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनला आहे. यापैकी ब्रिटन, फ्रान्स आणि रशियाच्या जीडीपीच्या वाढीचा दर अनुक्रमे तीन, दोन आणि एक टक्का होता. त्याच वेळी इटलीच्या जीडीपी वाढीचा दर वाढला नाही. ब्राझीलचा जीडीपी १५ टक्क्यांनी घसरला आहे. ही सर्व आकडेवारी भारतीय अर्थव्यवस्था प्रगतीच्या जलदमार्गावर सांगत आहे. तेव्हा सध्या सुरू असलेली रुपयाची घसरण आणि परदेशी वित्त संस्थांचे परतणे ही तात्पुरती परिस्थिती असून त्यावर मात करत भारतीय अर्थव्यवस्था नवी उंची गाठणार हे नक्की आहे.

अशात भारतीयांनी आपल्या अर्थव्यवस्थेवर विश्वास कायम ठेवत निर्धास्त व्हायला हवे तर आणि तरंच २०४७ चा विकसित भारतचे उद्दीष्ट्यदेखील साध्य होणार आहे. सरतेशेवटी संक्रमणाचा काळ हा कधीही कायमस्वरूपी नसतो. सध्या सुरू असलेले हे संक्रमण भविष्यातील विकासाची पायरी समजून भारतीयांना चिंतामुक्त होत भारतीय अर्थव्यवस्थेच्या बळकटीकरणाबाबत आश्वस्त असायला हवे. ■

# अटलजी : स्वतंत्र भारतातील हिंदुत्वाचा प्रखर आवाज



● माधव भांडारी, प्रदेश उपाध्यक्ष (मुख्यालय)

> गेल्या वर्षी २५ डिसेंबर रोजी सुरु झालेल्या मा.अटलजींच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने काही गोष्टी आग्रहाने मांडल्या पाहिजेत. ह्या निमित्ताने अटलजींबद्दल अनेक जण अनेक पद्धतीने लिहितील, बोलतील. पण काही मुद्दे फारसे मांडले जाणार नाहीत. असे काही मुद्दे मी पुढच्या काळात मांडणार आहे.

**त्यातला** सर्वात महत्वाचा मुद्दा आहे तो म्हणजे विचारांचा! स्वतंत्र भारताच्या राजकारणात हिंदू समाजाचा, हिंदुत्वाचा, राष्ट्रवादी विचारांचा आवाज भक्कमपणे उठवणारे अटलजी हे पहिले आणि बराच काळ एकटेच होते, हे फारसे कोणी सांगणार नाही. रा.स्व.संघाचे तरुण प्रचारक म्हणून सार्वजनिक आयुष्याची सुरुवात करून भारताच्या पंतप्रधानपदा पर्यंत त्यांनी केलेला प्रवास हा जसा एका व्यक्तीच्या स्वप्नवत वाटचालीचा, संघर्षाचा रोमहर्षक प्रवास आहे तसाच तो ह्या देशात राष्ट्रवादी हिंदुत्वाला कराव्या लागलेल्या कडव्या संघर्षाचा आणि यशस्वी वाटचालीचा ही इतिहास आहे. जनसंघ / भाजपाचे नेते म्हणून अटलजींनी केलेल्या कार्याबद्दल खूप लिहिता येईल, लिहावे लागेल. पण 'भारताचे पंतप्रधान' म्हणून त्यांच्या कारकिर्दीची जी अनेक वैशिष्ट्ये आहेत ती अगोदर नोंदवली पाहिजेत. त्यापैकी सर्वात पहिले म्हणजे ते जसे भारताचे पहिले खरेखुरे बिगर काँग्रेसी पंतप्रधान होते तसेच ते राष्ट्रवादी, हिंदुत्वाचा स्पष्ट पुरस्कार करणारे भारताचे पहिले पंतप्रधान होते. अटलजींच्या पूर्वी काही 'बिगर काँग्रेसी' पंतप्रधान झाले होते हे खरे असले तरी ते सगळेजण

तांत्रिक दृष्ट्या 'बिगर काँग्रेसी' होते. त्या सर्वांची राजकीय कारकीर्द काँग्रेसमध्येच गेली होती, त्या पक्षात आपल्या महत्वाकांक्षा पूर्ण होत नाहीत हे लक्षात आल्यामुळे बाहेर पडून त्यांनी 'बिगर काँग्रेसी' राजकारणाची कास धरली होती. काँग्रेसी विचारांशी, तत्वज्ञानाशी अथवा काँग्रेसी राजकारणाशी त्यांनी फारकत घेतली नव्हती. त्यामुळे त्यांचे 'बिगर काँग्रेसी'पण केवळ तांत्रिक होते. आजवर होऊन गेलेल्या पंधरा पंतप्रधानांपैकी अटलजी हेच असे पहिले पंतप्रधान होते की जे आयुष्यात कधीही काँग्रेसच्या वळचणीला उभे राहिले नव्हते, काँग्रेसचे तत्वज्ञान त्यांनी कधीही स्वीकारले नव्हते, उलट काँग्रेसच्या नेहरू प्रणित secularism आणि समाजवादाच्या भाषेला व कार्यपद्धतीला विरोध करण्याच्या भूमिकेतूनच त्यांनी राजकारणात प्रवेश केला. काँग्रेसला जो संकल्पना सहनसुद्धा होत नव्हती – 'भारताच्या प्राचीन संस्कृतीवर आधारित लढाऊ राष्ट्रवाद' – ती घेऊन ते राजकीय जीवनात उतरले. त्या विचारांना प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य खर्ची घातले. त्यासाठी त्यांनी आयुष्यभर प्रखर संघर्ष केला. त्या संघर्षाच्या काळात अनेक चढ–उतार अनुभवले, ही वैचारिक लढाई जिंकता येईल की नाही याबद्दल गंभीर शंका निर्माण करणारे क्षण अनुभवले पण अखेर विजय मिळवण्याला सुरुवात झालेली त्यांना अनुभवता आली. देशाचे पहिले 'राष्ट्र वादी, हिंदुत्ववादी पंतप्रधान होण्याची संधी त्यांना मिळाली, काँग्रेस आणि त्यांच्या विचारपद्धतीचा पूर्ण पराभव झालेला देखील त्यांना पहायला मिळाला. जी संघटना, विचारधारा – रा.स्व.संघ व हिंदुत्व – चिरडून टाकण्याची भाषा पं.नेहरू, इंदिरा गांधींपासून सोनिया, राहूल गांधींपर्यंत काँग्रेसच्या सर्व मुखंडांनी वापरली त्याच संघटनेतून आलेले व त्या विचारधारेची बांधिलकी मानून आयुष्यभर राजकीय कार्य करणारे पहिले पंतप्रधान बनण्याचा सन्मान त्यांना मिळाला. त्याचबरोबर पंतप्रधानपदाची पाच वर्षांची घटनात्मक मुदत यशस्वी रित्या पूर्ण करणारे पहिले बिगर काँग्रेसी पंतप्रधान देखील अटलजीच ठरले.

१९४७ साली स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पं.नेहरूंच्या नेतृत्वाखाली काँग्रेस आणि सगळ्या डाव्या मंडळींनी मिळून देशात असे एक विचित्र वातावरण तयार केले की 'हिंदू' हा शब्द उच्चारणे देखील सामाजिक गुन्हा ठरू लागला. म.गांधींच्या खुनाच्या घटनेचा पूर्णपणे गैरवापर करून प्रथम रा.स्व.संघावर बंदी घातली आणि नंतर संघाच्या बदनामीची एवढी सुनियोजित व व्यापक मोहीम राबवली की संघाचे किंवा जनसंघाचे काम करणारी व्यक्ती समाजात बहिष्कृत ठरू लागली. त्या काळात, त्या वातावरणात अटलजी जनसंघाचे नेतृत्व करत होते. पं.दीनदयाळ उपाध्याय जनसंघाचे संघटनात्मक, वैचारिक शिल्पकार होते, तर अटलजी जनतेला रोज दिसणारा चेहरा होते. जनतेशी सतत संवाद साधण्याचे काम अटलजी करत होते. त्या वेळेला आपला परिचय म्हणून अटलजी अभिमानाने सांगत होते – 'हिंदू तनमन हिंदू जीवन, रग रग मेरा हिंदू परिचय !' 'माझा कण कण हिंदू आहे; त्याचा मला अभिमान आहे' असे ठणकावून सांगणारे अटलजी हे त्या काळातील एकमेव राजकीय नेते होते. एका बाजूने पं.नेहरू आणि त्यांचे डावे साथी देशातल्या सगळ्या वाईट गोष्टींचे खापर हिंदू समाजाच्या डोक्यावर फोडत होते. हिंदू समाजाला कायम आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करून ठेवण्याचे इंग्रजांचे धोरणच नेहरू पुढे चालवत होते. त्या परिस्थितीत अटलजी हिंदू समाजाचा आत्मसन्मान जागा करण्यासाठी आठवण करून देत होते –

**'होकर स्वतन्त्र मैने कब चाहा है,**
**कर लूँ जग को गुलाम.**
**मैने तो सदा सिखाया है,**
**करना अपने मन को गुलाम ।**
**गोपाल राम के नामोंपर**
**कब मैने अत्याचार किये,**
**कब दुनिया को हिन्दु करने**
**घर घर मे नरसंहार किये ।**
**कोई बतलाए काबुल मे जाकर,**
**कितनी मस्जिदे तोडी'**

अटलजींनी त्या काळात केलेल्या वक्तव्यांचे महत्व आणि गांभिर्य आपल्याला आजच्या वातावरणात समजू शकणार नाही. पण त्या काळात, त्या परिस्थितीत अशा पद्धतीने हिंदुत्वाची भाषा बोलणे, हिंदुत्वाबद्दल अभिमान व्यक्त करणे हीच एक प्रकारची बंडखोरी होती, महापूर आलेल्या नदीमध्ये उडी मारून प्रवाहाविरुद्ध पोहण्याचे धाडस होते. तसे धाडस करून अटलजी भारताच्या राजकारणात उभे राहिले. हिंदुत्वाबरोबरची आपली ती बांधिलकी त्यांनी अखेरपर्यंत निभावली ही अटलजींची खरी थोरवी आहे.

**(पूर्वार्ध)**

# प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेचे ३५ लाख लाभार्थी!

**पहिल्या** अपत्यासाठी दोन हप्त्यांत ५ हजार रुपयांची मदत. गर्भवती माता व त्यांच्या नवजात बालकांचे तसेच स्तनदा मातेचे आरोग्य सुधारावे व त्यांना सकस पोषण आहार मिळून त्यांच्या आरोग्यात सुधारणा व्हावी या हेतूने राज्यात गेल्या अनेक वर्षांपासून 'प्रधानमंत्री मातृ वंदना योजना' राबविण्यात येत आहे. या योजनेचा आतापर्यंत राज्यातील ३५ लाख २६ हजार २६५ मातांनी लाभ घेतला आहे. त्यामुळे ही योजना राज्यात खऱ्या अर्थाने जीवनदायी ठरल्याचे आकडेवारीवरून स्पष्ट झाले आहे.

गरोदरपणात आणि बाळंतपणात महिलांना आरोग्य सेवा-सुविधा आणि प्रोत्साहनाच्या माध्यमातून कुपोषणाचा प्रभाव कमी करणे आणि माता व बाल आरोग्य सुधारणे हा 'प्रधानमंत्री मातृ वंदना योजने'चा उद्देश आहे. या योजनेंतर्गत पहिल्या अपत्यासाठी दोन हप्त्यांत ५ हजार रुपयांची मदत दिली जाते.

### योजना नव्या स्वरुपात

**केंद्राच्या १४ जुलै २०२२ रोजीच्या पत्रानुसार 'प्रधानमंत्री मातृ वंदना योजना-२' ही नव्या स्वरुपात लागू करण्यात आली आहे. या योजनेमध्ये पूर्वी केवळ पहिल्या अपत्यासाठी लाभ मिळत असे, मात्र आता १ एप्रिल २०२२ नंतर दुसरे अपत्य मुलगी जन्माला आल्यानंतरच्या लाभार्थीचा देखील या योजनेमध्ये समावेश करण्यात आला आहे.**

### गेल्या पाच वर्षांतील लाभार्थी

| वर्ष | संख्या |
|---|---|
| २०२३-२४ | १,१९,८२८ |
| २०२२-२३ | ५,२१,७५० |
| २०२१-२२ | ६,०९,९२१ |
| २०२०-२१ | ५,४७,२१९ |
| २०२४ ते २०२४ | २,८२,२३९ |

(जानेवारी ते नोव्हेंबर.)

# वंदे भारत स्लीपर रेल्वेगाड्या देणार जागतिक दर्जाच्या रेल्वे प्रवासाचा अनुभव



हे नवे वर्ष भारतातील प्रवाशांना जलद आणि सुरक्षित रेल्वे प्रवासाची भेट देण्यासाठी सज्ज झाले आहे. केंद्र सरकारने याआधीच देशभरातील रेल्वे प्रवाशांकरता, कमी आणि मध्यम पल्ल्याच्या बसण्याची आसन व्यवस्था(chair car) असलेल्या रेल्वे गाड्यांमधून जलद, सुरक्षित आणि जागतिक दर्जाच्या प्रवासाचा अनुभव घेण्याची सुविधा यशस्वीरित्या उपलब्ध करून दिली आहे. त्यानंतर आता भारतीय रेल्वे याच प्रकारच्या प्रवासाचा अनुभव लांब पल्ल्याच्या रेल्वे गाड्यांद्वारा घेण्याची सुविधा प्रत्यक्षात उपलब्ध करून देणार आहे. याच अनुषंगाने सुरू केल्या जाणार असलेल्या शयनयान सुविधायुक्त वंदे भारत रेल्वे गाड्यांच्या गेले काही दिवस असंख्य चाचण्या घेतल्या जात आहेत. या चाचण्यांमध्ये वंदे भारत शयनयान रेल्वे गाडीने ताशी १८० किलो मीटर वेग गाठला आहे. लवकरच या रेल्वे गाडांची सुविधा देशभरातील रेल्वे प्रवाशांसाठी उपलब्ध करून दिली जाणार आहे, त्याआधी या महिन्याच्या अखेरपर्यंत या चाचण्या सुरूच राहणार आहेत. या चाचण्यांपैकी भारतीय रेल्वेच्या कोटा विभागात घेतल्या गेलेल्या यशस्वी चाचणीची ध्वनिचित्रफित केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी समाज माध्यमांवरून सामायिक केली असून, त्यात त्यांनी वंदे भारत शयनयान रेल्वे गाडीचा वेगही नमूद केला आहे. केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी सामायिक केलेल्या या ध्वनिचित्रफितीमध्ये वंदे भारत शयनयान रेल्वे गाडीत एका आसना शेजारच्या टेबलस्वरुप सपाट पृष्ठभागावर पाण्याने जवळपास भरलेला ग्लास असून, त्या शेजारीच एक मोबाईल हँडसेट देखील आहे. ■

# रस्ते अपघातग्रस्तांना दीड लाखापर्यंतचे उपचार कॅशलेस !

## केंद्रीय रस्ते व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची घोषणा

**रस्ते** अपघातातील कोणत्याही पीडितास दीड लाख रुपयांपर्यंतचे मोफत कॅशलेस उपचार उपलब्ध करून देण्याची मोठी घोषणा केंद्रीय परिवहन आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केली आहे. कॅशलेस उपचारासंदर्भात येत्या मार्च महिन्यापर्यंत सरकार एक सुधारित योजना आणणार असल्याचे त्यांनी म्हटले. देशभरात कुठल्याही प्रकारच्या रस्ते अपघातातील प्रत्येक जखमींना दीड लाखापर्यंत कॅशलेस उपचार उपलब्ध करून दिले जातील. राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरणा (एनएचए) कडून पोलीस, रुग्णालय आणि राज्य आरोग्य संस्थेच्या समन्वयातून या योजनेची अंमलबजावणी केली जाईल. अपघात झालेल्या दिवसापासून सात दिवसांच्या कालावधीत जखमी व्यक्ती जास्तीत जास्त दीड लाख रुपयांपर्यंतच्या उपचाराचा हकदार असेल. सरकार यंदा मार्चपर्यंत यासंबंधीची सुधारित योजना आणणार आहे, अशी माहिती गडकरी यांनी पत्रकार परिषदेत दिली. सरकारने अगोदरच १४ मार्च २०२४ रोजी रस्ते अपघातातील पीडितांसाठी लेखात उपचार उपलब्ध करून देण्यासाठी एक प्रायोगिक कार्यक्रम चंदिगडमध्ये सुरू केला होता. रस्ते अपघातातील जखमींना वेळेवर वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देणे हा या कार्यक्रमाचा उद्देश होता. नंतर या कार्यक्रमाचा विस्तार सहा राज्यांपर्यंत करण्यात आला. शिवाय वैमानिकांप्रमाणे व्यावसायिक चालकांसाठी देखील कामांचे तास निश्चित करण्याबाबत कामगार कायद्यांचा अभ्यास केला जात आहे. कारण चालकांच्या थकव्यामुळे भीषण रस्ते अपघात होत असल्याचे नमूद करत गडकरी यांनी देशात २२ लाख चालकांचा तुटवडा असल्याचे म्हटले. देशातील परिवहन क्षेत्रात परिवर्तन आणण्याच्या दृष्टिकोनातून परिवहन व महामार्ग मंत्रालयाने कार्यशाळेचे आयोजन केले होते.

### मार्चपर्यंत योजना शक्य

१. कुठल्याही प्रकारच्या रस्ते अपघातातील प्रत्येक जखमींना दीड लाखापर्यंत कॅशलेस उपचार उपलब्ध होतील.

२. अपघात झालेल्या २ दिवसापासून सात दिवसांच्या कालावधीत जखमी व्यक्ती जास्तीत जास्त दीड लाख रुपयांपर्यंतच्या उपचारासाठी पात्र असेल. ■

# अपघातग्रस्तांना मदत करणा-यासाठी प्रोत्साहन रक्कम 25 हजार रु. करु: केंद्रीय मंत्री नितीन गडकरी

**रस्ते** अपघात झाल्यानंतरच्या 'गोल्डन अवर'मध्ये अपघातग्रस्तांचे प्राण वाचणे आवश्यक असते यामुळे अपघातग्रस्तांना मदत करणाऱ्या व्यक्तींना सरकारतर्फे ५ हजार रुपये दिले जातात या रकमेमध्ये वाढ करून ती २५ हजार रुपये करण्यात येईल, अशी माहिती केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी दिली. रस्ते सुरक्षा कार्यक्रमांतर्गत प्रसिद्ध बॉलिवूड अभिनेते अनुपम खेर यांनी घेतलेल्या मुलाखतीत गडकरी बोलत होते. अपघातग्रस्त व्यक्तींना मदत करणाऱ्या लोकांना पोलीस किंवा प्रादेशिक परिवहन अधिकारी कुठलेही प्रश्न विचारत नाहीत उलट या व्यक्तींना ५ हजार रुपये प्रोत्साहन म्हणून दिले जातात. या रकमेमध्ये आपण वाढ करणार असल्याचे सांगून संसदेने या अपघात ग्रस्त व्यक्तींना मदत करणाऱ्यांसाठी 'गुड सेमेरीटन ऍक्ट' पारित केला असल्याची माहिती गडकरी यांनी दिली. स्वयंसेवी संस्था समाजसेवक यांनी रस्ते सुरक्षा संदर्भात पुढाकार घेऊन काम करावे असं आवाहन त्यांनी केले. रस्ते सुरक्षा क्षेत्रात काम करणाऱ्या राजू वाघ, चंद्रशेखर मोहिते यांचे त्यांनी विशेष कौतुक केले. देशामध्ये १० हजार विद्यार्थी हे शाळेच्या आजूबाजूच्या सदोष ट्रॅफिक व्यवस्था तसेच चौकाची रचना यामुळे अपघाताला बळी पडतात ३० हजार व्यक्ती बिना हेल्मेट मुळे दगावतात. नागपूरच्या अजनीमध्ये २५ वर्षांपूर्वी खूप अपघात होत असत परंतु या चौकातील रस्ते अभियांत्रिकीच्या माध्यमातून सुधारणा केल्यामुळे आता २५ वर्षात येथे एकही अपघात झाला नाही असे त्यांनी सांगितले. ■

# राज्यात १ एप्रिलपासून टोलनाक्यांवर फास्ट-टॅगद्वारेच पथकर भरावा लागणार

**राज्यातील** पथकर वसुली नाक्यांवर १ एप्रिल २०२५ पासून सर्व वाहनांचा पथकर फास्ट-टॅगद्वारेच भरावा लागणार आहे. या निर्णयानुसार सध्याच्या सार्वजनिक खाजगी सहभाग धोरण २०१४ मध्ये सुधारणा करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. फास्ट टॅगच्या माध्यमातून पथकर वसुली झाल्यास पथकर वसुलीत अधिक सूसुत्रता, पारदर्शकता येणार आहे. पथकर नाक्यांवर वाहनांचा खोळंबा कमी होणार आहे. यातून वेळेची, इंधनाची बचत होणार आहे. फास्ट-टॅग शिवाय अन्य कोणत्याही माध्यमातून पथकर भरायचा झाल्यास किंवा फास्ट-टॅग सुरु नसेल किंवा टॅगशिवाय वाहनाने फास्ट-टॅगच्या मार्गिकेत प्रवेश केल्यास दुप्पट पथकर भरावा लागणार आहे. राज्यात सध्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या १३आणि महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या ९ रस्ते प्रकल्पांवर पथकर वसुली सुरु आहे. या ठिकाणी तसेच भविष्यात पथकर वसुल करावा लागणाऱ्या प्रकल्पांसाठी हा निर्णय लागू राहणार आहे.




### प्रशासकीय कामकाज अधिक सुलभ, गतीमान करण्यासाठी सुधारित महाराष्ट्र शासन कार्यनियमावली

प्रशासकीय कामकाज अधिक सुलभ आणि गतीमान करणारी सुधारित महाराष्ट्र शासन कार्यनियमावली प्रसिद्ध करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या सुधारणांमध्ये मंत्रिमंडळापुढे आणावयाची प्रकरणे, मुख्यमंत्री तसेच राज्यपाल महोदय यांच्या मान्यतेसाठी सादर करावयाची प्रकरणे, मंत्रिपरिषद व मंत्रिमंडळाची कार्यपद्धती आदी बाबींसंदर्भात तरतुदीचा समावेश आहे. अशी पहिली कार्यनियमावली १९७५ ला तयार करण्यात आली होती. त्यानंतर तिसऱ्यांदा अशी सुधारित कार्यनियमावली तयार करण्यात आली आहे. सुधारित कार्यनियमावली राज्यपाल महोदयांच्या मान्यतेनंतर शासन राजपत्रात प्रसिद्ध करण्यात येईल. कार्यनियमावलीतील बदलामुळे शासनाचा कारभार अधिक पारदर्शक, गतिमान व लोकाभिमुख होण्यास मदत होईल व त्याचा फायदा राज्यातील जनतेला होईल. या कार्यनियमावलीत काळानुरूप सुधारणा करण्यासाठी मंत्रालयीन विभागांच्या सचिवांचा एक अभ्यास गट गठीत करण्यात आला होता. यापुर्वी त्यांनी भारत सरकारच्या व इतर राज्यांच्या नियमावलींचा तुलनात्मक अभ्यास करून कार्यनियमावलीत सुधारणा करण्याची शिफारस केली आहे. सुधारित कार्यनियमावलीत ४८ नियम, ४ अनुसूची आणि १ जोडपत्र असून, ती नऊ भागांमध्ये विभागली आहे. पहिल्या अनुसूचीमध्ये मंत्रालयीन प्रशासकीय विभागांची नावे, दुसऱ्या अनुसूचीमध्ये मंत्रिमंडळासमोर आणावयाच्या प्रकरणांचा सविस्तर तपशील, तिसऱ्या अनुसुचीमध्ये मा. मुख्यमंत्री यांच्या मान्यतेसाठी सादर करावयाच्या प्रकरणांचा व चौथ्या अनुसूचीमध्ये मा. राज्यपाल यांच्या मान्यतेसाठी सादर करावयाच्या प्रकरणांचा सविस्तर तपशील दिला आहे. तसेच, जोडपत्रामध्ये मंत्रिपरिषदेची आणि मंत्रिमंडळाची कार्यपद्धती विषद केली आहे. त्याचबरोबर विधेयके सादर करण्याची कार्यपध्दती देखील सुटसुटीत करण्यात आली आहे. याशिवाय, नियोजन विभागाने करावयाच्या कामकाजाचा समावेश नव्याने कार्यनियमावलीत करण्यात आला आहे. तसेच, शासनाचा आदेश किमान अवर सचिव यांच्या स्तरावरुन काढण्याची तरतुद करण्यात आली आहे. या शासन कार्यनियमावलीमुळे शासनाच्या कामकाजातील निर्णय प्रक्रीया अधिक सुलभ आणि गतीमान होण्यास मदत होणार आहे. ■




पुणे– उपस्थिती– प्रदेशाध्यक्ष व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आ. सुनील कांबळे, शहराध्यक्ष धीरज घाटे आदी.



मुंबई– उपस्थिती– महिला मोर्चा प्रदेश अध्यक्ष आ.चित्रा वाघ, प्रदेश उपाध्यक्ष,मंगल वाघ, कल्याण जिल्हाध्यक्ष रेखा चौधरी, प्रदेश सचिव प्रिया शर्मा, प्रदेश कार्यालय सचिव त्रिशला हंचाटे–भावसार, जिल्हा सरचिटणीस प्रीती दीक्षित, अर्चना सूर्यवंशी, भावना मनराजे, कांचन मिश्रा.




पुणे– उपस्थिती– अनुसूचित जाती मोर्चाचे प्रदेश अध्यक्ष दिलीप कांबळे, उपाध्यक्ष संजीव खिलारे, प्रा.चांगदेव कांबळे, अतुल साळवे, प्रदीप कांबळे, राजू जाधव, रावसाहेब राखपसरे, प्रदेश चिटणीस रवींद्र खैरे, राजाभाऊ माने, अनिल भिसे, अतुल सरतापे आदी.



मुंबई– उपस्थिती– कौशल्य विकास व रोजगार मंत्री मंगलप्रभात लोढा.



पाथर्डी मंडल– उपस्थिती– आ. मोनिका राजळे, तालुकाध्यक्ष डॉ. मृत्युंजय गर्जे, नगराध्यक्ष अभयराव आव्हाड, महिला तालुकाध्यक्ष काशी गोल्हार, नंदकुमार शेळके, विष्णुपंत अकोलकर, संदीप पठाडे आदी.




मालवण– उपस्थिती– मत्स्यव्यवसाय आणि बंदरे विकास मंत्री नितेश राणे, जिल्हाध्यक्ष प्रभाकर सावंत, सिंधुदुर्ग जिल्हा बँकेचे अध्यक्ष मनीष दळवी, ज्येष्ठ पदाधिकारी विलास हडकर, जिल्हा उपाध्यक्ष अशोक सावंत, तालुकाध्यक्ष धोंडी चिंदरकर, शहरअध्यक्ष बाबा मोंडकर, माजी नगराध्यक्ष सुदेश आचरेकर, अभियान प्रमुख राजु परुळेकर आदी.



नाशिक– उपस्थिती– ज्येष्ठ नेते अभय छल्लाणी, माजी महानगर अध्यक्ष गिरीश पालवे, नरेंद्र सोनवणे, नंदकुमार देसाई, महानगर सरचिटणीस सुनील केदार, वासुदेवराव रोहनकर, डॉ. बोरसे, नंदू महाले, गणेश कांबळे, भारती बागुल, भारती मोरे, मृणाल नानीवडेकर आदी.



मालेगाव– उपस्थिती– ज्येष्ठ नेते सुरेश नाना निकम, दादा जाधव, जिल्हाध्यक्ष निलेश कचवे, शहराध्यक्ष देवा पाटील, युवा मोर्चा कार्यकर्ते लकी आबा गिल, जगदीश गोऱ्हे, शरद पानपाटील, श्याम गांगुर्डे, पप्पू पाटील आदी.




इचलकरंजी– उपस्थिती– प्रदेश उपाध्यक्ष सुरेश हाळवणकर, आ. डॉ. राहुल आवाडे, माजी मंत्री प्रकाश आवाडे, सदस्य अभियान प्रभारी विजय भोजे, शहराध्यक्ष अमृत भोसले, अशोक स्वामी, ज्येष्ठ नेते मिश्रीलाल जाजू आदी.



परभणी– उपस्थिती– विधानसभा प्रमुख डॉ. पंडित दराडे, तालुकाध्यक्ष गोविंद थिटे, माजी नगरसेवक ॲड. गोपाळ रोकडे, सुनील भोंवे, विलास भंडारे, प्रदीप चव्हाण, रवी घुगे, शहराधक्ष किशोर जाधव, गणेश कुरे, ॲड. सुनील मते, युवा मोर्चा तालुकाध्यक्ष माधव दराडे, सुमेर सूर्यवंशी, सय्यद फेरोज आदी.



छत्रपती संभाजीनगर– उपस्थिती– अल्पसंख्याक मोर्चा प्रदेश अध्यक्ष इद्रीस मुलतानी, सदस्य नोंदणी प्रमुख ज्ञानेश्वर पाटील आदी.




जामखेड– उपस्थिती– शहराध्यक्ष पवन राळेभात, प्रदेश उपाध्यक्ष सलीम बागवान, नगरसेवक शाकीर खान, प्रभाग अध्यक्ष सलीम तांबोळी, डॉ.अल्ताफ, प्रविण चोरडीया, तुषार बोथरा, नासीर शेख आदी.



वर्सोवा (मुंबई)– उपस्थिती– एस.एम खान, अनिता गुप्ता, फरहीन शेख, कल्पना सोलंकी, मजहर अंसारी, सुमन निषाद, सीमा गुप्ता आदी.




दहिसर (मुंबई)– उपस्थिती– अल्पसंख्याक मोर्चा मुंबई अध्यक्ष वसीम खान, मुंबई सचिव इनायत सायवनकर, आबिद शेख आदी.





पुणे येथे शिवसेना उबाठा गटाचे नगरसेवक विशाल धनवडे, बाळा ओस्वाल, प्राची आल्हाट, पल्लवी जावळे, संगीता ठोसर यांनी आपल्या समर्थकांसह भाजपात प्रवेश- उपस्थिती केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, महसूल मंत्री व प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, आ.रवींद्र चव्हाण, आ.सुनील कांबळे, प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे, पुणे शहराध्यक्ष धीरज घाटे आदी.




महसूल मंत्री व प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे व खा. अशोक चव्हाण यांच्या नेतृत्वात नांदेड जिल्ह्यातील काँग्रेसचे नेते शरद पाटील, भास्कर पाटील-जोमेगावकर, भास्कर पाटील-ढगे, उद्धवराव पाटील-ढेपे, नागोराव पाटील-मोरे, गोविंद पाटील-कपाळे, सतीश पाटील-शिंदे, कमलाकर पाटील-शिंदे, मधुकर डाकोरे, गजानन पाटील यांनी आपल्या समर्थकांसह भाजपात प्रवेश.



शिवसेना उबाठा गटाचे नायगावचे विभाग प्रमुख नंदकुमार पाटील, उपविभाग प्रमुख रणजित प्रकाश किणी, उपशाखाप्रमुख प्रविण घडांगळे, प्रवेश दुबे, बहुजन विकास आघाडीचे मनोज गुप्ता, मिक्की आनंद, दिनेश म्हात्रे, कल्पेश पाटील, प्रमोद रसाळ, ज्योती सिंग, कमलेश भोईर, सुहास घाडगे, मुकेश सरोज, महेश तिवारी, आशिष मिश्रा, अंकित दुबे, सचिन तिवारी, ऋषी पांडे आदी कार्यकर्त्यांनी भाजपात प्रवेश- उपस्थिती- संघटन पर्व प्रदेश प्रभारी आ. रवींद्र चव्हाण, आ. स्नेहा दुबे, प्रदेश सदस्य विजेंद्र कुमार, जिल्हा उपाध्यक्ष राजू म्हात्रे, मंडल अध्यक्ष सूर्यकांत वाघमारे, जितेंद्र पाटील, मेथीव कोलास्को, मयांक शेठ, अशोक यादव, मुकुंद मुळे आदी.

RNI NO. MAHMAR/2018/76180
Posting Under the Registration No.MCS/221/2024-26, License To Post Without Prepayment,
WPP Licence No.: MR/Tech/WPP-351/South/2024-26, Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001.
Published on 1st and 16th of every month and Posted on 8th, 9th, 10th and 23rd, 24th, 25th of every month.

https://www.facebook.com/bjpmanogat @manogatbjp

# महसूल विभाग होणार अधिक लोकाभिमुख

## वन स्टेट वन रजिस्ट्रेशन योजना

नागरिकांना कोणत्याही कार्यालयात दस्त नोंदणी करता येणार.

## ई-मोजणी

जीआयएस तंत्रज्ञानाद्वारे जमीन मोजणी होणार.

## फेसलेस दस्त नोंदणी

काही बाबीत घरबसल्या दस्त नोंदणी होणार.



प्रति,

**प्रेषक,**
**कार्यालय मंत्री :**
भारतीय जनता पार्टी,
महाराष्ट्र प्रदेश कार्यालय,
वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई-२०
दूरध्वनी : ०२२-२२०२२०५०, फॅक्स : ०२२-२२८५२३०५
ई मेल- bjpmaha.manogat@gmail.com